दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ५ अंक–५५ बुधवार दि.५ जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## मराठवाड्यात जरांगे फॅक्टरचा डंका

लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात चांगला धक्का बसला आहे. आता भाजप आणि राजकीय विश्लेषक यावर विचारमंथन करतील. पराभवाची कारणे समोर येतील. परंतु मराठवाड्यातील आठ मतदार संघांत भाजपचा धुव्वा उडाला. मराठवाड्यात भाजप–शिवसेना–राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव होण्यामागे महत्त्वाचे कारण मनोज जरांगे फॅक्टर असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील नाराजईमुळे मतदारांनी महायुतीऐवजी महाविकास आघाडीला निवडले.

## एनडीएवर जनतेचा सलग तिसऱ्यांदा विश्वास, हा ऐतिहासिक क्षण– मोदी

नवी दिल्लीः लोकसभा निवडणुक निकालावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पहिली प्रतिक्रिया पुढे आलेली आहे. एक्स पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेचे आभार मानले आहेत. लोकांनी एनडीएवर तिसऱ्यांदा विश्वास व्यक्त केला, भारताच्या इतिहासातील हा ऐतिहासिक क्षण आहे,'' असे त्यांनी म्हटले आहे. जनता जनार्दनसमोर मी नतमस्तक होत आहे, गेल्या दशकभरात लोकांच्या अपेक्षांची पूर्तता करताना जी चांगली कामे केली आहेत, ती पुढे सुरू राहतील. मी आमच्या कार्यकर्त्यांना नमन करतो. त्यांनी केलेल्या कष्टांची भरपाई शब्दांतून होणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.


# कांदा उत्पादक शेतकऱ्यांची नाराजी भाजपाला भोवली !

## कांदा पट्यातील विद्यमान खासदारांसह नऊ जणांना पराभवाचा दणका



**नाशिक। प्रतिनिधी**

उत्तर महाराष्ट्रातील कांदा उत्पादक पट्ट्यात शेतकऱ्यांची नाराजी भाजपला चांगलीच भोवली असून, या ठिकाणी विद्यमान खासदारांना पराभवाचे धनी व्हावे लागले आहे. दुसरीकडे दिल्ली दरबारी कांद्याची बाजू लावून धरणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदारांना मात्र मोठ्या मताधिक्याने संसदेत जाण्याची संधी मिळाली आहे. साहजिकच यावरून यंदाच्या लोकसभा निवडणूकीत कांदा हा



सर्वाधिक महत्त्वपूर्ण आणि परिणामकारक मुद्दा ठरला असल्याचे म्हणता येईल.

कांद्याचे दर वाढल्याने दिल्लीतील भाजपाचे राज्य सरकार कोसळल्यानंतर कांदा हा कायमचा राजकीय मुद्दा बनला. कांद्याचे दर वाढल्यास निवडणुकीत फटका बसतो, हे गृहीतक धरून नेहमीच कांद्याचे दर रोखून धरण्यावर भर देण्यात आला. यंदाच्या निवडणुकीत मात्र कांद्याचे दर रोखून धरल्यामुळे शेतकऱ्यांचेही होणारे नुकसान राजकारण्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी कांदा उत्पादकांनी चांगलाच चंग बांधला होता आणि अखेर कांदा उत्पादक पट्ट्यात शेतकऱ्यांनी भाजप विरोधात कौल देत भाजपाच्या उमेदवारांना पराभवाची धूळ चारली आहे. कांद्याचे दर वाढल्याने ग्राहक नाराज होऊन पान २ वर

### कांदा चर्चेच्या मागणीला जय श्रीरामने उत्तर...

भारत जोडो यात्रा दरम्यान काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांची भेट घेऊन व्यथा जाणून घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भर सभेत कांद्यावर बोला असे सांगूनही त्यावर न बोलता जय श्रीरामच्या घोषणा दिल्या. यातून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना चिथावल्यासारखे झाले आणि त्यांनी मतदानाच्या दिवशी देखील मतदान केंद्रापर्यंत कांदाच्या माळा घालून जात आपला संताप दाखवून दिला. प्रत्यक्ष मतदानही त्याच पद्धतीने झाले असून, निकालावरून कांद्याने भाजपाचे वांदे केल्याचे स्पष्ट झाले आहे.

### कांदा पट्ट्यातील पराभूत उमेदवार

भारती पवार, हेमंत गोडसे, हिना गावित, सुजय विखे, सुभाष भामरे, अढळराव पाटील, सदाशिव लोखंडे, राम सातपुते, रणजितसिंग निंबाळकर या सगळ्या कांदा पट्ट्यातील खासदारांना लोकसभा निवडणूकीत पराभव पत्कारावा लागला आहे.

## मजूर, गरिब, शेतकरी, आदिवासींनी संविधान वाचविले - राहूल गांधी



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

लोकसभा निवडणूक आम्ही लोकशाही वाचविण्यासाठी लढवली. आमची लढाई संविधान वाचविण्यासाठी होती. देशातील मजूर, गरिब, शेतकरी, आदिवासींनी संविधान वाचविले आहे, त्यांचे मी आभार मानतो. यापुढे त्यांच्यासोबत काँग्रेस कायम राहील, अशी ग्वाही देत इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांच्या समन्वयातून यश मिळाले आहे, असे राहूल गांधी म्हणाले. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. सत्ता स्थापनेबाबत इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर पुढील निर्णय घेणार आहोत. बुधवारी यासंदर्भात आम्ही मित्र पक्षांशी चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाईल, अशी माहिती काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिली.

ते पुढे म्हणाले की, आमची बँक खाती गोठवली, मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकले, मोदी– शहांनी अनेकांना धमकावले. लोकशाहीवर हल्ला करण्याचा भाजपने प्रयत्न केला. परंतु, पान २ वर

# भाजपा बहुमतापासून दूर!

## सत्तास्थापनेसाठी इंडिया आघाडीकडून पत्ते पिसायला सुरुवात

## नितीशकुमार, चंद्राबाबू नायडू इंडिया आघाडीचे किंगमेकर?



**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**भाजपाला स्पष्ट बहूमत मिळाले नसल्याच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीकडून सत्ता स्थापनेसाठी हालचाली सुरु केल्या आहेत. तसेच भाजपाच्या एनडीए आघाडीतील घटक पक्ष असलेल्या जनता दल युनायटेड्च्या नितीश कुमार आणि तेलगू देसम पार्टीचे प्रमुख चंद्राबाबू नायडू यांच्याशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत. त्यामुळे इंडिया आघाडी सरकाराचे किंगमेकर नितीनकुमार आणि चंद्राबाबू नायडू हे बनणार असल्याची चर्चा सुरु झाली आहे.**

लोकसभा निवडणूकीच्या मतमोजणीला बुधवार दि.४ जून रोजी सकाळी सुरुवात झाली. महाराष्ट्रासह, उत्तर प्रदेश आणि इतर हिंदी भाषिक राज्यांमध्ये इंडिया आघाडी आणि घटकपक्षांना मतदारांना चांगल्यापैकी प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले. मात्र ज्या भाजापाने ४०० पारचा नारा दिला होता. त्या भाजपाला ४०० काय २५० जागा मिळणेही अवघड होऊन बसले. तर इंडिया आघाडीच्या विजयी जागांची हळूहळू घोषणा होत गेली. आरजेडीने दावा केला की बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि तेलुगु देसम पक्षाचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू यांना सुडाच्या राजकारणासाठी नापसंती आहे ज्यामुळे ते भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएपासून दूर जाऊ शकतात. यामुळे आता बुधवारी इंडिया आघाडीच्या नेत्यांच्या बैठकितून काय निर्णय घेतला जातो याकडे लक्ष लागले आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशातील वाराणसी लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचे अजय राय यांच्या विरोधात दीड लाखांहून अधिक मतांनी विजय मिळवला. केरळमधील वायनाड आणि उत्तर प्रदेशातील रायबरेली या दोन्ही लोकसभा जागांवर काँग्रेस नेते राहुल गांधी विजयी झाले आहेत. दरम्यान, अखिलेश यादव यांचा समभाग पान २ वर

## तब्बल १० वर्षांनंतर काँग्रेस मुख्यालयाने अनुभवला उत्साह

नवी दिल्लीः लोकसभा निवडणूक निकालाचे कल मंगळवारी दुपारी स्पष्ट होवू लागले तसे काँग्रेस १०० जागांपेक्षा अधिक जागांवर आघाडी घेतल्याचे दिसले. या यशाने अकबर रोडवरील काँग्रेस पक्ष मुख्यालयात कार्यकर्त्यांची गर्दी वाढत गेली. प्रमुख नेत्यांनीही कार्यालय गाठले. तब्बल दहा वर्षांनंतर काँग्रेस मुख्यालयात असा उत्साह बघायला पान २ वर

# बीडमध्ये शेवटच्या फेरीपर्यंत थरार; बजरंग सोनवणे ६५५३ मतांनी विजयी

## पंकजा मुंडे यांचा निसटता पराभव; जरांगे फॅक्टर ठरला निर्णायक

**बीड । प्रतिनिधी**

**राज्यात सर्वात हाय व्होल्टेज आणि जातीय रंग लागल्याने चर्चेत ठरलेली लढत बीड लोकसभा मतदारसंघात झाली. बीड, परभणी, जालना मतदारसंघात मराठा आरक्षणाचा व मनोज जरांगे फॅक्टर जाणवल्याचे दिसून आले. बीडमध्ये पहिल्या फेरीपासूनच अत्यंत चुरस पाहायला मिळाली. ३३ फेरीअंती बजरंग सोनवणे यांनी ६ हजार ५५३ मतांनी पंकजा मुंडे यांचा पराभव केला. मुंडे यांनी फेरमतमोजणीची मागणी केली होती. त्यामुळे बराच वेळ सोनवणे यांचा विजय घोषित करण्यात आला नव्हता.**



मराठा आरक्षण, मनोज जरांगे फॅक्टर, राष्ट्रवादीतील फूट या कारणांमुळे चर्चेत व लक्षवेधी ठरलेल्या बीड लोकसभा मतदारसंघात क्रिकेट सामन्यातील शेवटच्या षटकांपर्यंत व्हावी अशी चूरस दिसून आली. शेवटच्या षटकात सामना बरोबरीत सुटावा आणि सुपर ओव्हरमध्ये सामन्याचा निकाला लागावा अशीच परिस्थिती बीडमधील लोकसभेच्या निवडणूक निकालात दिसून आली. पहिल्या फेरीपासून पुढील काही फेरीपर्यंत बजरंग सोनवणे यांनी आघाडी घेतली होती. मात्र, ५ ते १० हजारांच्या फरकावर सुरू असलेल्या फेऱ्यामुळे येथील मतदारसंघात अत्यंत चुरस निर्माण झाली होती. उमेदवारांची धाकधूक आणि कार्यकर्त्यांचीही उत्कंठा शिगेला पोहोचली, ती शेवटच्या ३२ व्या फेरीपर्यंत कायम राहिली. पान २ वर

# फोडाफोडी अन् जरांगे फॅक्टरने राज्यात महायुतीचे कंबरडे मोडले

## काँग्रेस सर्वात मोठा पक्ष, भाजप ठाकरेंना समान जागा

### काँग्रेस १३, भाजप ९, ठाकरे गट ९, शरद पवार गट ८, शिंदे गट ७, अजित पवार गट १

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात जरांगे फॅक्टर आणि फोडाफोडीच्या राजकारणामुळे लोकसभा निवडणुकीत भाजप महायुतीचे कंबरडे मोडले आहे. राज्यात महाविकास आघाडीने २९ जागांवर विजय मिळवला. तर महायुती १९ जागांवर थांबली. ठाकरे शिवसेना आणि शरद पवारांच्या पक्षाला राज्यात कमालीची सहानुभुती मिळाल्याने भाजपला मोठा फटका बसला.**

राज्यात महाविकास आघाडीमध्ये सर्वाधिक २१ जागा या शिवसेना ठाकरे गटाने लढल्या. तर त्यानंतर काँग्रेसने १७ जागा तर राष्ट्रवादी शरद पवार गटाने १० जागा लढवल्या. तर दुसरीकडे महायुतीमध्ये सर्वाधिक २३ जागा या भाजपने लढवल्या, तर शिंदे गटाने १५ आणि अजित पवारांनी चार जागा लढवल्या होत्या. यात भाजपला ९ जागा, शिंदे शिवसेना ७, अजित पवार १, काँग्रेस १३, ठाकरे शिवसेना ९, शरद पवार गट ८ तर एक अपक्ष निवडून आला आहे. राज्यात भाजपने केलेली फोडाफोडी आणि जरांगे फॅक्टरचा महायुतीला जबर फटका बसला. त्यामुळे महायुतीला बॅकफुटवर जावे लागले. पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०३ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ४.०० क्विंटल | २,२०० | २,३२० | २,२६० |
| ज्वारी/हायब्रिड :५८.५० क्विंटल | १,९०० | ३,३३० | २,३५५ |
| मूग : १.५० क्विंटल | ५,००१ | ७,१०० | ६,०५० |
| तूर : ११.०० क्विंटल | ९,७०० | १०,९१० | १०,१०४ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ४३.०० क्विंटल | २,२०० | २,८४५ | २,५३५ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ८८.५० क्विंटल | ४,४०० | ४,५३१ | ४,५०० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ६,४०१ | ५,९३३ |

# मराठवाड्यात मनोज जरांगे फॅक्टरने केला भाजप-सेनेचा धुव्वा

## संदिपान भुमरेंनी लाज राखली; दानवे, चिखलीकरांसह दिग्गज पराभूत



**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात चांगला धक्का बसला आहे. मराठवाड्यातील आठ मतदार संघात संभाजीनगर सोडता सर्वत्र भाजप–सेनेचा जरांगे फॅक्टरने धुव्वा उडाला आहे. संभाजीनगरमध्ये संदिपान भुमरे यांनी चुरशीच्या लढतीत बाजी मारल्याने थोडी का होईना महायुतीची त्यांनी लाज राखली. काँग्रेस आणि ठाकरे गट यांना प्रत्येकी ३ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाला एक जागा मिळाली.**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी जालनामधून सुरुवात केली. अंतरवली सराटीत त्यांनी उपोषण केले. त्यांच्या उपोषणस्थळी लाठीमार झाल्याचा प्रकार घडला. त्यानंतर हे आंदोलन राज्यभर पसरले. मनोज जरांगे पाटील यांनी दोन वेळा उपोषण केले. परंतु त्यांची सगेसोयऱ्याची मागणी पूर्ण झाली नाही. त्यामुळे मराठा समाजातील नाराजीचा फटका महायुतीला बसला.

बीडमध्ये भाजपच्या पंकजा मुंडे यांच्या पेक्षा बजरंग सोनवणे यांना आघाडी मिळाली आहे. शेवटच्या ३२ व्या फेरीनंतर सोनवणे यांची आघाडी कायम राहिली मात्र पंकजा मुंडे आक्षेप घेत फेर मतमोजणी मागणी केली त्यामुळे बीडचा निकाल प्रलंबित ठेवला होता. धाराशिवमध्ये ठाकरे गटाचे ओमराजे निंबाळकर यांनी दुसऱ्यांदा बाजी मारली. तीन लाखापेक्षा जास्त मताधिक्य मिळवत त्यांनी अजित पवार गटाच्या अर्चना पाटील यांचा पराभव केला. परभणीमध्ये रासपचे महादेव जानकर यांचा पराभव करीत ठाकरे गटाचे बंडू जाधव हे दुसऱ्यांदा खासदार झाले आहेत. जालना मतदार संघात पाच वेळा खासदार होणाऱ्या रावसाहेब दानवे यांना काँग्रेसचे कल्याण काळे यांनी धूळ चारली. संभाजीनगरमध्ये तिसऱ्या स्थानी राहतील असे संदिपान भुमरे यांच्याविषयी पान २ वर

### विजयी उमेदवार

नांदेड: वसंतराव चव्हाण , धाराशिव: ओमराजे निंबाळकर, लातूर : डॉ. शिवाजी काळगे, जालना: कल्याण काळे, संभाजीनगर : संदिपान भुमरे, हिंगोली: नागेश आष्टीकर, परभणी: बंडू जाधव

## अग्रलेख

# मराठवाड्यात जरांगे फॅक्टरचा डंका

लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात चांगला धक्का बसला आहे. आता भाजप आणि राजकीय विश्लेषक यावर विचारमंथन करतील. पराभवाची कारणे समोर येतील. परंतु मराठवाड्यातील आठ मतदार संघांत भाजपचा धुव्वा उडाला. मराठवाड्यात भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव होण्यामागे महत्त्वाचे कारण मनोज जरांगे फॅक्टर असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील नाराजीमुळे मतदारांनी महायुतीऐवजी महाविकास आघाडीला निवडले.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी जालना जिल्ह्यातून सुरुवात केली. अंतरवाली सराटीत त्यांनी उपोषण केले. त्यांच्या उपोषणस्थळी लाठीमार झाल्याचा प्रकार घडला. त्यानंतर हे आंदोलन राज्यभर पसरले. मनोज जरांगे पाटील यांनी दोन वेळा उपोषण केले. परंतु त्यांची सगेसोयऱ्यांची मागणी पूर्ण झाली नाही. त्यामुळे मराठा समाजातील नाराजीचा फटका महायुतीला बसला. निकालानुसार मराठवाड्यातील सहा ठिकाणी भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी म्हणजे महायुतीच्या उमेदवाराचा पराभव झाला. मराठवाड्यात शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसला चांगलेच यश मिळाले. जालनामध्ये काँग्रेसचे कल्याण काळे, काँग्रेसचे शिवाजीराव काळगे (लातूर), नांदेडमधून काँग्रेसचे वसंतराव चव्हाण, हिंगोलीतून ठाकरे गटाचे नागेश पाटील, धाराशिवमधून ठाकरे गटाचे ओमराजे निंबाळकर, परभणी ठाकरे गटाचे संजय जाधव निवडून आले आहेत. म्हणजे आठ पैकी सहा जागा या दोन मित्र पक्षाला मिळाल्या आहेत. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, रासपचे महादेव जानकर, भाजपचे विद्यमान खासदार प्रताप पाटील चिखलीकर, सुधाकर शृंगारे यांना पराभव पत्करावा लागला. दुसरीकडे अत्यंत चर्चेत असलेली बीड लोकसभा यावर सुद्धा जरांगे फॅक्टरने काम केल्याचे दिसून येत आहे. शेवटच्या टप्प्यापर्यंत चूरस राहिलेल्या या निवडणुकित राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या बजरंग सोनवणे यांनी महायुतीच्या उमेदवार भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांचा पराभव केला. मात्र याठिकाणी पंकजा मुंडे यांनी आक्षेप घेत काही ठिकाणची फेर मतमोजणी करण्याची मागणी केली, त्यामुळे उशिरापर्यंत अधिकृत निकाल देण्यात आला नाही.

बीड जिल्ह्यात ओबीसी आणि मराठा विशेष करून मराठा - वंजारी हा वाद पेटल्यामुळे त्याचा परिणाम निवडणुकीवर झाला. त्यामुळे बीडची लढत अटीतटीची ठरली. सर्वात महत्वाचे म्हणजे, ऐन निवडणुकीच्या तोंडावर अशोक चव्हाण यांनी भाजप मध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे नांदेडच्या निकालाकडे अनेकांचे लक्ष होते. भाजपचे प्रताप पाटील चिखलीकर यांना निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. माजी आमदार वसंतराव चव्हाण यांनी त्यांचा पन्नास हजार पेक्षा अधिक मतांनी पराभव केला. जरांगे पाटील यांनी निवडणुकिच्या काळात मराठवाड्याचा दौरा करताना सगळ्या मतदारसंघात लक्ष घातले होते. मतदान कोणाला करावयाचे याबाबत ते स्पष्ट काही बोलले नाही मात्र त्यांची भुमिका ही भाजपा विरोधात होती हे स्पष्ट आहे. निवडणूक कार्यक्रम लागण्यापुर्वी जरांगे पाटील यांनी अगदी स्पष्ट शब्दांत भाजप आणि फडणवीस यांच्यावर रोष व्यक्त करीत मराठा समाजाने त्यांना ताकद दाखवावी असे उघडपणे आवाहन केले होते. यामुळेच भाजपा उमेदवाराला बऱ्याच ठिकाणी विरोध झालेला दिसून आला. बीड मध्ये पंकजा मुंडे तर जालन्यामध्ये रावसाहेब दानवे यांना मराठा समाजाकडून अडविण्याच्या घटना घडल्या होत्या. एकंदर परिस्थिती पाहता जरांगे पाटील यांचा मराठवाड्यात मोठा परिणाम झाला असून, भाजपाला याचा मोठा फटका बसला आहे हे मान्य करावे लागेल.

# शहरातील वाढती लोकसंख्या, विकासकामे आणि पर्यावरणाचा असमतोल !

आर्थिक महासत्ता होऊ पाहणाऱ्या देशांमध्ये भारत सर्वात आघाडीवर आहे, मात्र वाढत्या लोकसंख्येच्या आधारावर जर देश महासत्ता होऊ पाहत असेल तर ती येणाऱ्या संकटाची नांदी आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यासह देशाने अनुभवला. यंदा पाऊससुद्धा तेव्हढ्याच प्रमाणात बरसणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. गेल्या काही वर्षांत ऋतुचक्रात होणारी असंतुलितता माणसाच्या आरोग्यावर परिणाम करत आहे. पर्यावरणाचा समतोल ढळतो आहे आणि या सर्वाला कारणीभूत आपणच आहोत. आजमितीला देशात अनियंत्रितपणे वाढणाऱ्या लोकसंख्येवर कोणताच अंकुश नाही. मानवाच्या मूलभूत गरजा पुरवणारे नैसर्गिक स्रोत मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येचा ताण त्यावर पडत आहे. शहरासारख्या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांची संख्या आणि क्षमता मर्यादित आहे. अल्प पावसामुळे ही जलाशये भरली नाहीत तर पाणीकपातीचे संकट ओढवते. यंदा या संकटाचा सामना शहरवासीयांनी केला आहे. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे येणाऱ्या काळात हे संकट अधिक भयावह होणार आहे. रोजगारासाठी लोकांचे लोंढेच्या लोंढे प्रतिदिन शहराकडे धाव घेतात. वाढत्या उद्योगधंद्यासह शहरांतील श्रीमंतांची संख्याही वाढल्याने शहरांत ठिकठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आहेत. या सर्वांसाठी झाडांची आणि नैसर्गिक संपत्तीची सर्रासपणे कत्तल केली जात आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुकीची साधने अपुरी पडू लागली आहेत. लोकल रेल्वेला पर्याय म्हणून शहरांमध्ये आलेले प्राथमिक टप्प्यातील मेट्रो रेल्वे आणि मोनो रेल्वे हे प्रकल्पही अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे आता शहरांत ठिकठिकाणी मेट्रो प्रकल्पाचे जाळे उभारण्याचे काम सुरु झाले आहे. हे मेट्रोमार्ग तयार करण्यासाठी पुन्हा रस्ते खोदले जात आहेत. शहरांतील वाढत्या संख्येच्या तुलनेत रस्त्यांची रुंदी कमी पडू लागल्याने आता ठिकठिकाणी रस्ते रुंदीकरणाची कामेही सुरु करण्यात आली आहेत. शहरांतील ठराविक ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अशा भागांत नवनवीन उड्डाणपुलांची कामेही सुरु झाली आहेत. हे सर्व कमी पडते म्हणून आता सागरी सेतू उभारले जाऊ लागले आहेत. शहरांतील प्रमुख रस्त्यांवर सुरु असलेले मेट्रो प्रकल्प, उड्डाणपुलाची कामे आणि रस्ते रुंदीकरणाची कामे यांमुळे सकाळ आणि संध्याकाळी वाहनांच्या मोठमोठ्या रांगा लागून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या कोंडीत वाहन चालकांकडून अनावश्यक वाजवल्या जाणाऱ्या हॉर्न्समुळे रस्त्याच्या दुतर्फा राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावरील खोदकामांमुळे उडणारी धूळ, खोदकाम करणाऱ्या यंत्रांचे प्रचंड आवाज आणि गाड्यांचे कर्णकर्कश हॉर्न यांमुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. ध्वनी आणि वायू या दोन्ही प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. याशिवाय शहरांत ठिकठिकाणी सुरु असलेल्या टोलेजंग इमारतींची कामे यांमुळेही प्रदूषणात भर पडत आहे. रस्त्यावरील पुलांची कामे आणि इमारतींची उभारणी यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सिमेंट आणि तत्सम रासायनिक पदार्थांमुळे वातावरणातील हवेत विषारी धूलिकण पसरू लागले आहेत ज्यामुळे सर्वच विकसनशील शहरांतील हवेची गुणवत्ता घसरून त्याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होत आहे. दिवाळीच्या दरम्यान दिल्ली, मुंबईसह अनेक शहरांतील हवेची गुणवत्ता कमालीची घसरून वातावरणातील विषारी धूलिकणांचे प्रमाण वाढले होते. त्यावेळी सर्वच ठिकाणचे खोदकाम आणि इमारतीच्या बांधकामांवर बंधने आणली होती. ही सर्व कामे आता पुन्हा सुरु झाली आहेत, त्यामुळे शहरातील नागरिकांना प्रतिदिन श्वासाबरोबर विषारी आणि प्रदूषणकारी हवा ग्रहण करावी लागत आहेत. गर्भवती स्त्रिया, दम्याचे रुग्ण, वयोवृद्ध आणि लहान मुले यांना या प्रदूषित हवेचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. श्वसनविकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे, तर दुसरीकडे पर्यावरण वाचवण्यासाठी कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत. पर्यावरणाचे महत्व शाळा महाविद्यालयांत शिकवले जाते; मात्र ते जपण्यासाठी शहरसारख्या ठिकाणी कोणतीही अनुकूलता दिसून येत नाही. लोकसंख्या वाढत जात आहे आणि वाढत्या लोकसंख्येच्या सुविधेसाठी विकासकामे जोर धरू लागली आहेत. या सर्वांमध्ये पर्यावरणाची मात्र अपरिमित होनी होत आहे.

**जगन घाणेकर,** घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

# बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी १७१ स्टॉलच्या साहित्याचे किट वाटप

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत सुरू असलेल्या बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने उपक्रम हाती घेतला आहे बीड जिल्ह्यासाठी सन २०२० मध्ये ७३ किट उपलब्ध झाल्या असून आतापर्यंत १७१ बचत गटासाठी स्टॉलच्या साहित्याचे किट मिळाले आहेत या किटमध्ये चौकोनी तंबू खुर्ची टेबल फोल्डिंग टेबल रॅक स्टॅन्ड अभी साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असून बचत गटाच्या मार्फत बीड जिल्ह्यातील तालुका तसेच महत्त्वाची गावे प्रदर्शन बाजार आदी ठिकाणी




आदी ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या स्टॉल साठीचे साहित्य या कीटमार्फत जिल्ह्याला मिळाले आहे. यापूर्वी यापूर्वी ९८ तर सन २०२३ या वर्षांमध्ये ७३ असे एकूण १७१ किट जिल्ह्याला प्राप्त झाले आहेत. उमेद अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रकल्प संचालिका संगीता देवी पाटील यांचे अधिकारी आणि कर्मचारी प्रयत्नशील आहेत. बीड जिल्ह्यात उमेद अंतर्गत बचत गटाचे कार्य वाढविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या उपक्रम राबविण्यात येत आहेत. बचत गटामार्फत महिला अधिक सक्षम होत असून बचतगट विविध उत्पादन आणि वस्तू तसेच खाद्यपदार्थ तयार करत आहेत या सर्व साहित्यांना आणि खाद्यपदार्थांना जिल्ह्यात मोठी मागणी आहे बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी आणि महिलांच्या स्वावलंबनासाठी सर्व घटकांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांनी केले आहे.

# मोरगाव शिवारात वीज पडुन कडब्याची गंज खाक

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे.मोरगाव शिवारातील लक्ष्मणबाबाचा माळ याठिकाणी आज दि.३ सोमवार रोजी सायंकाळी साडेपाच वाजता वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसात वीज पडुन पोपट सोनबा जाधव या शेतकऱ्याची ४५०० कडब्याची गंज जळुन खाक झाली असुन यात जवळपास १ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. सोमनावाडी येथील रहिवासी असणारे पोपट सोनबा जाधव आपल्या पत्नी व मुलासह गेल्या सहा वर्षांपासून मोरगाव येथील बापुराव कागदे यांच्या मालकीच्या १० एकर शेतामध्ये बटईने राबत होते. मोरगाव पासुन १ किलोमीटर अंतरावरील लक्ष्मणबाबाचा माळ याठिकाणी पत्र्याच्या घरात वास्तव्य करून



राहतात.आज सायं साडेपाच वाजता घरी असताना अचानक वीज कडाडल्याचा आवाज आला. त्यांचा मुलगा संतोष यांने घराबाहेर पाहिले असता आवाज आलेल्या ठिकाणी ज्वारीच्या कडब्याची गंजीने पेट घेतला होता. तिघांनी हंड्याने पाणी घेऊन जाळ विझवण्याचा प्रयत्न केला परंतु आग आटोक्यात आलीच नाही. सायं साडेपाच वाजल्यापासून पेटलेली गंज रात्री साडे नऊ वाजेपर्यंत पेटलेलीच होती.यात ज्वारीच्या ४५०० कडबा जळुन खाक झाला असुन जवळपास १ लाख रूपयांचे नुकसान झाले. तलाठी मंडळ अधिकारी यांना फोनवरून कल्पना दिली असता आम्हाला फोटो पाठवा आम्ही ऊद्या येऊन बघतो असे उत्तर त्यांना मिळाले. आपत्ती व्यवस्थापनाच्या नावाने गाजावाजा करणा-या प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन त्यांना नुकसान भरपाई द्यायला हवी.

# बोगस खते बियाणे विक्रेत्यांवर कृषी विभागाची करडी नजर

**वडवणी । प्रतिनिधी**

खरीप हंगामात बोगस खते बियाणे विक्री दरवर्षीच काही दुकानदारांकडून केली जाते. त्यामुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान होते तसेच दुबार पेरणी चे संकट शेतकऱ्यावर ओडावते याला आळा घालण्यासाठी यावर्षी कृषी विभागाने बोगस बियाणे खते विक्रेत्यांवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथकाची नियुक्ती केली असून हे भरारी पथक तालुक्यातील कृषी दुकानदारावर बारकाईने लक्ष ठेवणार आहे. वडवणी तालुक्यात एकून ११८ परवानाधारक कृषी दुकाने आहेत.दरवर्षी

## वडवणी तालुक्यात भरारी पथकाची नियुक्ती

काही दुकानदारांकडून वाढीव दराने बियाण्याची आणि खताची विक्री केली जाते त्यामुळे शेतकऱ्यांना बिलाची पक्की पावतीही दुकानदार देत नाहीत बिलाची पक्की न देणाऱ्या दूकान दारांची तक्रार शेतकऱ्यांने केल्यास आशा दूकान दारावरही कार्यवाही होनार आहे किमतीपेक्षा जास्त दराने खते आणि बियाणे विकणाऱ्या दुकानदारावर ही कार्यवाही होनार असुन अशा कृषी दुकानाचा परवाना निलंबित करण्यात येणार आहे. त्यामुळे बोगस बियाणे खते विकणारे आणि वाढीव दराने ही बियाणे खते विकनाऱ्यांची आणि बिलाची पक्की पावती न देणाऱ्या दुकानदारांची माहिती कृषी विभागाला देण्याचे आवाहन तालुका कृषी कार्यालय वडवणी यांनी शेतकऱ्यांना केले आहे. वडवणी तालुक्यात शहरी भागासह ग्रामीण भागातील मिळून एकूण ११८ परवानाधारक कृषी दुकाने आहेत.या सर्व दुकानदारावर लक्ष ठेवण्यासाठी तालुक्यात एक भरारी पथक आसनावर आहे. शेतकऱ्यांची कोणतीही तक्रार आल्यास या पथकाकडून कार्यवाही करण्यात येणार आहे. बोगस बियाणे खते औषधे यांची विक्री करणाऱ्या तसेच खरेदीची पक्की पावती न देणाऱ्या दुकानदारावर भरारी पथक कारवाई करणार आहे या भरारी पथकात मंडळ कृषि अधिकारी ,कृषि अधिकारी पंचायत समिती , कृषि अधिकारी तालुका कृषि कार्यालय व तालुका कृषि अधिकारी असणार आहेत. खरीप हंगामात बोगस बियाणे खते यांची विक्री करताना आढळून आल्यास खतातील रासायनिक घटकांचे प्रमाण बरोबर आहे का याची तपासणी प्रयोगशाळेत होणार आहे तसेच बियाण्यांची ही तपासणी होणार आहे यामध्ये दोषी आढळल्यास थेट परवाना रद्द होऊ शकतो खरीप हंगामात बोगस बियाणे खते यांची विक्री दुकानदारांकडून सुरू असल्यास तसेच बिलाची पक्की पावती न देणाऱ्या दुकानदाराची शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तक्रार करावी आम्ही तात्काळ अशा दुकानदारावर कारवाई करू तसेच वडवणी तालुक्यात मुबलक प्रमाणात बियाणे आणि खते उपलब्ध आहेत कुठलाही तुटवाडा होणार नाही शेतकऱ्यांनी विशिष्ट अशा एकाच वानाचा हट्ट धरु नये परवानाधारक कृषी दुकानदारांकडून बोगस बियाणे खते यांची विक्री होत असल्यास किंवा किमतीपेक्षा जास्त भावाने बियाणे खते विक्री केली जात असल्यास शेतकऱ्यांनी तालुका कृषी कार्यालयात आणि पंचायत समिती मधील कृषी विभागात लेखी स्वरूपात तक्रार करावी.

## पान १वरून...

### कांदा उत्पादक शेतकऱ्यांची

राजकीय नुकसान होते, त्याच पद्धतीने कांद्याचे दर पाडून शेतकरीही नाराज होऊन त्यामुळेही राजकीय नुकसान होऊ शकते हे दाखवून देण्यासाठी ही निवडणूक शेतकऱ्यांनी अक्षरशः हातात घेतल्याचे दिसून आले.भाजपा शासनाने कांदा निर्यातबंदी घोषित करून वेळोवेळी उत्पादकांचे कंबरडे मोडले आहे. ऐन निवडणूक काळात देखील केंद्र शासनाने केवळ ग्राहकांचा विचार करीत कांदा निर्यातबंदी कायम ठेवली. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतप्त भावना आणि असंतोष निर्माण झाला. अर्थात यामुळे आगामी काळात कांदा उत्पादकांच्या हिताकडे लक्ष दिले जाईल का? हा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरीतच आहे.

--------

### भाजपा बहुमतापासून

नाटकीयरित्या वाढला आणि त्यांच्या समाजवादी पक्षाने उत्तर प्रदेशमध्ये सत्ताधारी भाजपाला चांगलेच रोखले. जसजसे ट्रेंड समोर आले तस तसे भाजपाच्या जागांच्या तुलनेत सपाने आघाडी घेतली.

-------------

### मजूर, गरिब, शेतकरी, आदिवासींनी

काँग्रेसच्या सर्व नेत्यांनी घटक पक्षांच्या नेत्यांचा आदर केला. आम्ही सर्वांनी एकसाथ लढत दिली, असे ते म्हणाले. वायनाड, रायबरेलीतील जनतेला मनापासून धन्यवाद देतो, असे ते म्हणाले.

**हा जनता आणि लोकशाहीचा विजय आहे - मल्लिकार्जुन खर्गे**

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, हा जनता आणि लोकशाहीचा विजय आहे. मोदी विरूद्ध जनता अशी लढत होती. परंतु पूर्ण बहुमत मिळाले नाही. आम्ही जनमताचा कौल स्वीकार करत आहोत. लोकसभा निवडणुकीत मोदी आपल्या नावाने मते मागत होते. त्यामुळे हा त्यांचा नैतिक पराभव आहे. बहुमत मोदींच्या विरोधात आहे, असे खर्गे म्हणाले. प्रतिकूल परिस्थितीत काँग्रेस आणि इंडिया आघाडीने निवडणूक लढवली. सरकारी यंत्रणेने मोठा त्रास दिला. मात्र, काँग्रेसचा प्रचार सकारातमक होता. महागाई, बेरोजगारी यावर प्रचार केला. काँग्रेसच्या जाहीरनाम्याबाबत मोदींनी गैरसमज परविले, परंतु ते जनतेने धुडकावून लावले. या निवडणुकीत राहुल गांधीच्या भारत जोडो यात्रेचा फायदा झाला. संवैधानिक संस्थांचा विरोधकांवर गैरमार्गाने वापर केला, त्यामुळे लोकशाही धोक्यात आली. सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्या अपार प्रयत्नामुळे काँग्रेस मजबूत स्थितीत पोहोचली आहे. इंडिया आघाडीतील सगळ्यांनी एकसाथ मिळून प्रचार केला. एकमेकांना मदत केली. लोकांच्या हक्कांसाठी, लोकशाहीच्या रक्षणासाठी, सीमांच्या रक्षणासाठी आमचे प्रयत्न पुढे सुरूच राहतील, असे ते म्हणाले.

-----------

### तब्बल १० वर्षानंतर काँग्रेस मुख्यालयाने

मिळाला. लोकसभा निवडणूक निकालाचे कल दुपारी हाती आल्यावर भाजप स्वबळावर बहुमताचा आकडा गाठू शकत नसल्याचे आणि काँग्रेसने जागांची शंभरी गाठल्याचे स्पष्ट होताच राजधानी दिल्लीत भाजपच्या गोटात निराशेचे वातावरण पसरले. मात्र, काँग्रेसला अपेक्षेपेक्षा जास्त जागा मिळत असल्याचे लक्षात येताच या पक्षात उत्साहाचे वातावरण बघायला मिळाले. एनडीए आघाडी ३०० जागांवर पुढे असल्याचे दिसताच दीनदयाळ उपाध्याय मार्गावरील भाजपच्या मुख्यालयात ढोलताशे वाजत होते. मात्र, त्याठिकाणी कार्यकर्त्यांची फारशी गर्दी दिसून आली नाही. उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाने भाजपला मागे टाकल्याचे चित्र दिसताच भाजपचे नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये निराशा पसरली. निवडणूक निकालात भाजपला मोठा विजय मिळणार असल्याच्या खात्रीने भाजप मुख्यालयात बुंदीचे लाडू वळविले जात होते. मात्र, भाजप व एनडीएचे सरकार स्थापन होण्यात अनिश्चितता असल्याचे बघून लाडू वळविणे थांबविण्यात आले. तयार झालेले लाडूही पॅक करून ठेवण्यात आले.

-------------

### मराठवाड्यात मनोज जरांग

म्हटले जात होते. मात्र त्यांनी ठाकरे गटाचे चंद्रकांत खैरे, एमआयएमचे इम्तियाज जलील यांचा मोठ्या फरकाने पराभव केला. नांदेडमध्ये भाजपचे प्रतापराव चिखलीकर यांचा काँग्रेसचे वसंतराव चव्हाण यांनी मोठ्या फरकाने पराभव केला. हा पराभव अशोक चव्हाण यांचा असल्याचे म्हटले जात आहे. लातूरमध्ये भाजपचे विद्यमान खासदार सुधाकर श्रृंगारे यांचा काँग्रसचे डॉ. शिवाजी काळगे यांनी पराभव केला. तर हिंगोलीमध्ये ठाकरे गटाचे नागेश पाटील आष्टीकर यांनी शिंदे शिवसेनेचे बाबुराव कोहळीकर यांचा पराभव केला. मराठवाड्यातील आठपैकी महायुतीला केवळ एक जागा जिंकता आली. काँग्रेस जालना, नांदेड, लातूर, ठाकरे गट धाराशिव, हिंगोली, परभणी तर शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ बीडची जागेवर आघाडी घेता आली.

-------------

### बीडमध्ये शेवटच्या फेरीपर्यंत थरार;

पंकजा मुंडेंनी बजरंग सोनवणेंची आघाडी तोडून तब्बल ४३ हजारांची आघाडी घेतली होती. मात्र, ३१ व्या फेरीत पुन्हा पंकजा मुंडेंचा लीड कमी होऊन बजरंग सोनवणेंनी आघाडी घेतली. पंकजा मुंडेंचा लीड कमी होऊन शेवटच्या काही फेरीत हे मताधिक्य केवळ ४०० मतांवर येऊन पोहोचलं होतं. त्यामुळे, राज्यात सर्वात थरारक आणि उमेदवारांच्या काळजाचे ठोके चुकवणारी ही लढत ठरली आहे. ३१ व्या फेरीत बजरंग सोनवणेंनी आघाडी घेतल्यामुळे शेवटच्या म्हणजेच ३२ व्या मतमोजणीकडे सर्वांचे लागले होते. ३१ व्या फेरीअखेर बजरंग सोनवणे ६८८ मतांनी आघाडीवर पोहोचले होते. त्यामुळे, ३२ व्या फेरीत नेमकं काय होईल, याची उत्सुकता सर्वांनाच लागली होती. बजरंग सोनवणे यांना ३१ व्या फेरीअखेर ६ लाख ७४ हजार ५०७ मतं मिळाली आहेत. तर, पंकजा यांना ६ लाख ७३ हजार ८१९ मतं मिळाली आहेत. त्यामुळे, पंकजा मुंडे आणि बजरंग सोनवणे यांच्यातील निवडणूक अत्यंत चुरशीची झाली असून शेवटच्या फेरीपर्यंत निकालाची धाकधूक सर्वांना लागली होती. यावेळी बजरंग सोनवणे यांचा ६५८५ मतांनी विजय झाला. पंकजा मुंडे यांनी फेरमतमोजणीची मागणी केल्याने विजय घोषित करण्यात बराच विलंब झाला. शेवटी उशिरा बजरंग सोनवणे यांचा विजय घोषित करण्यात आला.

----------

### फोडाफोडी अन् जरांगे

४८ मतदारसंघांमध्ये हे उमेदार झाले विजयी १) दक्षिण मुंबई अरविंद सावंत ठाकरे गट, २) दक्षिण मध्य मुंबई अनिल देसाई ठाकरे गट, ३) उत्तर पश्चिम मुंबई अमोल कीर्तीकर ठाकरे गट,, ४) बुलढाणा प्रतापराव जाधव शिंदे गट, ५) ठाणे नरेश म्हस्के शिंदे गट, ६) कल्याण श्रीकांत शिंदे शिंदे गट, ७) नाशिक राजाभाऊ वाजे ठाकरे गट, ८) औरंगाबाद संदीपान घुमरे शिंदे गट, ९) हिंगोली नागेश पाटील ठाकरे गट, १०) यवतमाळ संजय देशमुख ठाकरे गट, ११) हातकणंगले धैर्यशील माने शिंदे गट, १२) मावळ श्रीरंग बारणे शिंदे गट, १३) शिर्डी भाऊसाहेब वाकचौरे ठाकरे गट, १४) बारामती सुप्रिया सुळे- शरद पवार गट, १५) शिरुर डॉ. अमोल कोल्हे शरद पवार गट, १६) उत्तर मुंबई पियूष गोयल भाजप १७) उत्तर मध्य मुंबई वर्षा गायकवाड काँग्रेस, १८) नंदुरबार गोवाल पाडवी काँग्रेस, १९) धुळे डॉ. शोभा बच्छाव काँग्रेस (आघाडी), २०) जालना कल्याण काळे काँग्रेस, २१) लातूर शिवाजीराव काळगे काँग्रेस २२) नांदेड वसंत चव्हाण काँग्रेस, २३) अकोला अनुप धोत्रे भाजप, २४) अमरावती बळवंत वानखेडे काँग्रेस, २५) नागपूर नितीन गडकरी भाजप, २६) भंडारा-गोंदिया प्रशांत पडोले काँग्रेस, २७) गडचिरोली डॉ. नामदेव किरसान काँग्रेस, २८) चंद्रपूर प्रतिभा धानोरकर काँग्रेस, २९) पुणे मुरलीधर मोहोळ भाजप, ३०) सोलापूर प्रणिती शिंदे काँग्रेस, ३१) भिवंडी बाळामामा म्हात्रे शरद पवार गट, ३२) दिंडोरी भास्करराव भगरे शरद पवार गट, ३३) रावेर रक्षा खडसे भाजप, ३४) बीड बजरंग (बप्पा ) सोनवणे शरद पवार गट (आघाडीवर), ३५) वर्धा अमर काळे शरद पवार गट, ३६) माढा धैर्यशील पाटील शरद पवार गट, ३७) सातारा उद्यनराजे भोसले भाजप, ३८) अहमदनगर निलेश लंके शरद पवार गट, ३९) मुंबई उत्तर पूर्व संजय दिना पाटील ठाकरे गट, ४०) पालघर डॉ. हिमंत सावरा भाजप, ४१) सिंधुदुर्ग नारायण राणे भाजप, ४२) जळगाव स्मिता वाघ भाजप, ४३) सांगली विशाल पाटील अपक्ष, ४४) रायगड सुनील तटकरे अजित पवार, ४५) धाराशिव ओमराजे निंबाळकर ठाकरे, ४६) परभणी संजय जाधव ठाकरे, ४७) रामटेक श्यामकुमार बर्वे काँग्रेस, ४८) कोल्हापूर शाहू महाराज छत्रपती काँग्रेस

----------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. ५ जून २०२४



## परभणीत १०० कोटींची उलाढाल, पण उपयोग नाहीच–जाधव

**परभणी । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील लोकसभा निवडणुकीत यंदा मराठा आरक्षण, मनोज जरांगे पाटील फॅक्टरने काम केल्याचं निवडणूक निकालातून दिसून आलं. बीडमध्ये अत्यंत अटीतटीची निवडणूक झाल्यानंतर परभणीतही महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा विजय झाला आहे. परभणीत ठाकरेंच्या शिवसेनेचे उमेदवार संजय बंडू जाधव यांच्या विजयानंतर समर्थकांनी जल्लोष केला. विजयी मिरवणूकपूर्व बंडू जाधव यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी, त्यांनी महादेव जानकर यांच्यावरही टीका केली. दरम्यान, निवडणूक निकालापूर्वीच बंडू जाधव यांनी मनोज जरांगेंच्या आंदोलनाचा मला फायदा झाल्याचं म्हटलं होतं. त्यातच, जाधव यांच्या विजयी मिरवणुकीत मनोज जरांगेंचे फोटो झळकल्याचं पाहायला मिळालं.

महाविकास आघाडीचे परभणीतील उमेदवार संजय जाधव हे १ लाख २१ हजार मताधिक्याने आघाडीवर होते, त्यामुळे त्यांच्या विजयाची केवळ औपचारिकता शिल्लक राहिली आहे. यावेळी त्यांनी मतमोजणी कक्षाला भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर, विजय निश्चित झाल्याचा आनंद साजरा करत पत्रकारांशी संवाद साधला. शंभर कोटी रुपयाची उलाढाल महादेव जाणकरांकडून करूनही उपयोग झाला नाही. केवळ जातीवर आधारित निवडणूक लढवून विजयी होता येत नसल्याचा टोला संजय जाधव यांनी भाजप अन्? महादेव जानकर यांना लगावला आहे. दरम्यान, संजय जाधव यांच्या समर्थकांकडून जल्लोष साजरा करण्यात येत असून, महाविकास आघाडीच्या नेत्यांची विजय मिरवणूक शहरात काढण्यात आली आहे. यावेळी विजयी मिरवणुकीत काही मराठा बांधवांनी मनोज जरांगे यांचे फोटो झळकावले. मराठा आरक्षण आंदोलन व मनोज जरांगेंच्या फॅक्टरचा लाभ परभणीतील महाविकास आघाडीच्या उमेदवारास झाल्याचे आंदोलकांनी सूचवलं आहे.

# ईशान्य मुंबईत ठाकरे गटाची सरशी, संजय दिना पाटलांनी पराभवाचा वचपा काढलाच

**मुंबई । प्रतिनिधी**

उत्तर पूर्व मुंबई लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीतर्फे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजय दिना पाटील यांनी बाजी मारली आहे. त्यांचा सामना महायुतीतर्फे भाजपचे उमेदवार मिहीर कोटेचा यांच्याशी झाला होता. संजय दिना पाटील यांना ४ लाख ५० हजार ९३७ एवढी मते मिळाली, तर कोटेचा यांना ४ लाख २१ हजार ७६ मते मिळाली. हा मतदारसंघ २०१४ च्या मोदी लाटेत भाजपच्या ताब्यात गेला होता, मात्र अखेर शिवसेनेला तो खेचून आणण्यात यश आले आहे. त्यामुळे उत्तर पूर्व मुंबईत तिसऱ्यांदा कमळ फुलवण्याचं भाजपचं स्वप्न अधुरंच राहिलं.

घाटकोपर पूर्व आणि पश्चिम, विक्रोळी, भांडुप, मुलुंड, मानखुर्द शिवाजीनगर असे सहा विधानसभा मतदारसंघ असलेल्या या लोकसभा मतदारसंघात शिवसेना (उबाठा) पक्षाचे भांडुपमधून रमेश कोरगावकर आणि विक्रोळीमधून सुनील राऊत हे दोन आमदार आहेत. घाटकोपर पूर्वमधून राम कदम, घाटकोपर पश्चिममधून पराग शाह आणि मुलुंडमधून मिहीर कोटेचा हे भाजपचे, तर मानखुर्द शिवाजीनगरमधून समाजवाटी पक्षाचे अबू आझमी आमदार आहेत.

या मतदारसंघात मराठी मतदार साधारण चार लाख आहेत. गुजराती, मारवाडी मतदार पावणेतीन लाख असून त्यापाठोपाठ दोन लाख ७० हजार उत्तर भारतीय मतदार आहेत. मुस्लिम मतदारांची संख्या दोन लाख ६० लाख इतकी आहे. तसेच दक्षिण भारतीयांची संख्याही लक्षणीय आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार संजय पाटील यांची भिस्त मराठी आणि मुस्लिम मतांवर होती, तरी अन्य मते मिळवण्यासाठीही त्यांना प्रयत्न करावे लागलेत.

२०१४ पासून उत्तर पूर्व मुंबईवर भाजपचे वर्चस्व राहिले होते. २००९ मध्ये मनसेच्या शिशिर शिंदे




यांना मिळालेल्या सुमारे दोन लाख मतांमुळे भाजपच्या किरीट सोमय्या यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते. सोमय्या हे चार हजार मतांनी पराभूत झाल्याने त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असलेले संजय दिना पाटील निवडून आले होते. २०१४ च्या मोदी लाटेत सोमय्या यांनी पाटील यांचा तीन लाख १७ हजार १२२ मतांनी पराभव केला. त्यावेळी सोमय्या यांना पाच लाख २५ हजार २८५ मते मिळाली होती.

१९८४ मध्ये काँग्रेसच्या लाटेत या जागेवरून गुरूदास कामत खासदार झाले होते. त्यानंतर १९८९ मध्ये भाजपच्या जयवंतीबेन मेहता, १९९१ मध्ये पुन्हा कामत, १९९६ मध्ये भाजपचे प्रमोद महाजन, १९९८ मध्ये पुन्हा कामत विजयी झाले. २००४ मध्येही कामतांनी येथून विजय मिळवला होता. २००९ मध्ये मात्र या जागेवर राष्ट्रवादीच्या संजय पाटील यांचा विजय झाला. त्यानंतर पुन्हा ही जागा भाजपकडे गेली. २०१९ च्या निवडणुकीत भाजपचे मनोज कोटक यांना पाच लाख १४ हजार ५९९ मते मिळाली होती.

एकूण १६ लाख मतदार असलेल्या उत्तर पूर्व मतदारसंघात लोकसभा निवडणुकीत भाजपला नेहमीच भांडुपचा काही भाग, मुलुंड, घाटकोपरच्या काही भागातून चांगले मतदान होते. येथील मतदान भाजपसाठी नेहमीच निर्णायक ठरते. सन २०१९ मध्ये या भागातून ५७ टक्के मतदान झाले होते. २०१४ मध्ये ते ५१ टक्के होते. गेल्या दोन लोकसभा निवडणुकीत संजय पाटील यांना मानखुर्द शिवाजीनगर, विक्रोळीबरोबरच, घाटकोपर आणि भांडुपमधील काही भागातूनही चांगले मतदान झाले होते. महायुतीचे उमेदवार मिहीर कोटेचा हे सध्या भाजपचे मुलुंडमधील आमदार आहेत. मुलुंडबरोबरच घाटकोपरमध्ये असलेल्या गुजराती आणि उत्तर भारतीयांची मते भाजपच्या पारड्यात पडत असल्याने येथील मते त्यांना हमखास मिळण्याची शक्यता होती.

याआधी दोन वेळा लोकसभा निवडणूक लढवलेल्या पाटील यांना भाजपचे वर्चस्व असलेल्या पट्ट्यात मते मिळवण्यासाठी बरेच झगडावे लागले. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेत पडलेल्या फुटीमुळे मते विभागली जाण्याची शक्यता होती. घाटकोपर पूर्वेकडील रमाबाई आंबेडकरनगर, विक्रोळी कन्नमवार नगरसह भांडुपमधील काही भागांतून काही मते मिळण्याची शक्यता महाविकास आघाडीला असतानाच नंदेश उमप यांना वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी दिल्यामुळे मते फिरण्याची शक्यता होती.

## सोलापूरला मिळाली पहिली महिला खासदार

### प्रणिती शिंदेंनी काढला वडिलांच्या पराभवाचा वचपा

**सोलापूर । प्रतिनिधी**

लोकसभा मतदार संघात सुशिलकुमार शिंदे यांना दोन वेळा पराभवाचा सामना करावा लागला होता. २०१४ आणि २०१९ लोकसभा निवडणुकीत सुशिलकुमार शिंदे यांचा पराभव झाला होता. तर २००४ साली प्रणिती शिंदेंच्या आई उज्वला शिंदेंचा पराभव झाला होता. आता प्रणिती शिंदे यांनी भाजपचा पराभव करत वडिलांच्या पराभवाचा वाचपा काढला आहे.



१९५१ पासून सोलापूर लोकसभा मतदारसंघामध्ये एकही महिला खासदार नव्हता. सोलापूर लोकसभा मतदारसंघाची स्थापना झाल्यापासून म्हणजे १४ वेळा खासदार झाले होते, पण त्यामध्ये एकही महिला खासदार नव्हत्या. पण २०२४ च्या निवडणुकीत सोलापूरकारांनी प्रणिती शिंदे यांच्यावर विश्वास दाखवत इतिहास रचलाय.

हा सोलापूरकरांचा विजय आहे. जनतेने विश्वास ठेवून मोठी संधी दिली आहे. मी लोकसभेत जाऊन सोलापूरांचे प्रश्न मांडण्यासाठी आतुर आहे . सोलापूरच्या जनतेने भाजपला धडा शिकवला, असे प्रणिती शिंदे म्हणाल्या.

आमदार प्रणिती शिंदेनी जाई–जुई विचारमंच या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्याला सुरुवात केली. त्यानंतर २००९ साली सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघातून निवडणूकीच्या रिंगणात उतरल्या. तत्कालीन आमदार नरसय्या आडम यांचा पराभव देखील आमदार प्रणिती शिंदेनी केला. २०१४, २०१९ च्या मोदी लाटेत जिथे काँग्रेसच्या अनेक दिग्गजांचा निभाव लागला नाही. त्याही वेळी आमदार प्रणिती शिंदेनी विजयश्री खेचून आणला. सलग तीन वेळा आमदार राहिल्याने सोलापूर शहरात आमदार प्रणिती शिंदेची चांगली पकड आहे. तर प्रदेश काँग्रेसने कार्याध्यक्ष आणि राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या सदस्यपदी संधी देऊन प्रणितींना चांगलेच बळ देखील दिले आहे.

एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला अशी ओळख असलेल्या सोलापूर लोकसभा मतदार संघाची ओळख होती. १९५२ साली सोलापूर लोकसभा मतदार संघाची स्थापना झाली. सुरुवातीचे पाच वर्ष शेतकरी कामगार पक्षाचे शंकर मोरे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या शेड्युल कास्ट फेडरेशनचे पी. एन. राजभोग यांनी सोलापूरचे खासदार म्हणून प्रतिनिधित्व केलं. १९५७ साली सोलापुरात संयुक्त महाराष्ट्र समितीचे जयवंत मोरे हे सोलापूरचे खासदार झाले.

मतदारसंघ स्थापनेच्या १० वर्षांनी सोलापुरात १९६२ साली काँग्रेसचा उदय झाला. १९९६ आणि २००३ या दोन निवडणुकांचा अपवाद वगळला तर २०१४ पर्यंत काँग्रेसने निर्विवाद वर्चस्व सोलापूर लोकसभा मतदार संघात गाजवलं. १९६२ साली मडेप्पा उर्फ अप्पासाहेब काडादी, १९६७, १९७१, १९७७ सुरजरत्न दमाणी, १९८०, १९८४ गंगाधर कुचन, १९८९, १९९१ धर्मन्ना सादुल या काँग्रेस नेत्यांनी सोलापुरात खासदारकीच्या माध्यमातून देशाच्या संसदेत नेतृत्व केलं.

## सर्वसामान्य माणसांची ताकद काय असते हे जनतेनेच दाखवून दिले–उद्धव ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात महाविकास आघाडीने दमदार यश मिळवल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आनंद व्यक्त केला आहे. त्याचबरोबर त्यांनी भाजपवर सुद्धा जोरदार हल्लाबोल केला. सर्वसामान्य माणसाने सर्वसामान्य माणसाची ताकद काय असते, ते दाखवून दिल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. राज्यामध्ये महाविकास आघाडीने मिळवलेल्या दमदार यशानंतर शिवसेना भवनमध्ये उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत आपली प्रतिक्रिया दिली.



विशाल पाटील आमच्यातच येतील

दरम्यान, सांगली लोकसभेला विशाल पाटील यांनी दणदणीत विजय मिळवला आहे. त्यांनी भाजपच्या संजय काका पाटील आणि ठाकरे गटाचे चंद्रहार पाटील यांचा पराभव करत विजय मिळवला. मात्र, सांगलीमध्ये ठाकरे गटाकडून उमेदवार देण्यात आल्यानंतर काँग्रेसकडून कडाडून विरोध करण्यात आला. त्या जागेवरती दावा कायम ठेवण्यात आला होता. मात्र ठाकरेंनी सुद्धा माघार न घेत चंद्रहार पाटील यांची उमेदवारी कायम ठेवली होती. या सर्व पार्श्वभूमीवर त्यांना सांगलीच्या निकालवरून विचारण्यात आला असता त्यांनी सांगितले की, सांगली बाबत आमचा निकाल चुकला असून पण विशाल पाटील आमच्यातच येतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

पंतप्रधानपदाचे दावेदार नसल्याचे स्पष्ट

दरम्यान, मस्तवालपणा दाखवणाऱ्यांचं काय होतं, हे जनतेने दाखवून दिलं आहे असं त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, भारतीय जनता पक्ष प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत मिळाल असलं, तरी भाजपला एकहाती बहुमत मात्र मिळालेलं नाही. त्यामुळे दोन्हीकडून चंद्रबाबू नायडू आणि नितीशकुमार यांना सोबत घेत सत्ता स्थापनेचा दावा केला जाण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर एनडीएची उद्या बैठक बोलावण्यात आली आहे. दुसरीकडे इंडिया आघाडीची सुद्धा बैठक बोलवण्यात आली आहे. या बैठकीला आपण जाणार आहात का? असे विचारले असता त्यांनी आधी संजय राऊत आणि मग काही खासदार जाणार असल्याचे सांगितले. त्यांच्यानंतर मी उद्या (५जून) दुपारी दिल्लीला जाणार असल्याचे म्हणाले. दरम्यान, आपण पंतप्रधानपदाचे दावेदार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते कोण असेल याबाबतचा निर्णय उद्या घेतला जाईल, असेही ते म्हणाले.

पान ६ वरून...

### ना लेकाला निवडून आणता

कोणत्याही परिस्थितीत सुप्रिया सुळे यांचा पराभव करण्यासाठी अजित पवार यांनी त्यांच्या पत्नी, सुनेत्रा पवार यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं. संपूर्ण पवार कुटुंबीयांचा विरोध असला तरी त्याला न जुमानता अजित पवारांनी शरद पवारांच्या विरोधात वक्तव्यं सुरूच ठेवली.

अजित पवारांच्या भूमिकेवर बारामतीकर नाराज

सुनेत्रा पवार यांना निवडून आणण्यासाठी अजित पवारांनी जंग–जंग पछाडलं. जे जे नेते सुप्रिया सुळेंच्या प्रचारात होते, त्यांना कोणत्याही मार्गाने आपल्याकडे वळवलं. त्यामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना मदत करताना कोणतीही कसर सोडली नाही. आतापर्यंत बारामतीमध्ये जी काही विकासकामं केली आहेत ती आपणच केली असल्याचा दावा अजित पवारांनी केला. नेमकं हीच गोष्ट बारामतीकरांना आवडली नसल्याचं आता निकालानंतर स्पष्ट होतंय. बारामतीमधील निवडणूक ही अतितटीची होणार असल्याचं चित्र असतानाही निकालानंतर मात्र तसं काही झालं नसल्याचं दिसून आलं. सुप्रिया सुळे यांनी लाखाहून जास्त लीड घेतलं.

### ३ लाख १६ हजारांचा

**संजय जाधव :** परभणीत महायुतीचे उमेदवार संजय जाधव यांच्या विजयाची केवळ औपचारिकता बाकी असून संजय जाधव यांनी १ लाख २१ हजार मतांनी आघाडीवर आहे. तर, महादेव जानकरांचा पराभव निश्चित मानला जात असून अधिकृत निकाल येण्यासाठी थोडा विलंब होईल.

**राजाभाऊ वाजे** : नाशिक लोकसभा मतदारसंघात शिवसेना (ठाकरे गट) राजाभाऊ वाजेंनीही लाखांच्यावर मताधिक्य घेतलं आहे. सायंकाळी ६ वाजेपर्यंत राजाभाऊ वाजे यांनी १ लाख ९ हजार ६३९ मतांचं मताधिक्य घेतलं आहे.


## चंद्रपूर धानोरकरांचेच, सुधीर मुनगंटीवार अडीच लाखांनी पराभूत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा मतदारसंघ आपलाच आहे हे महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर यांनी सिद्ध करून दाखवले. त्यांनी भाजपचे उमेदवार व राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा तब्बल २ लाख ५३ हजार २५६ मतांनी पराभूत केले.

प्रतिभा धानोरकर यांचे पती बाळू धानोरकर यांनी मागील निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळविला होता. तत्कालीन केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांचे त्यांनी राजकीय अस्तित्व जिल्ह्यातून संपवले. विधानसभेच्या निवडणुकीत त्यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर विजयी झाले. पती खासदार आणि पत्नी आमदार असे एकाच घरी दोन नेते वावरत होते. दुर्दैवाने खासदार बाळू धानोरकर यांचे आजाराने अकाली निधन झाले.

त्यांचा वारसा पुढे चालवण्यासाठी प्रतिभा धानोरकर यांची पदर खोचला. काँग्रेसच्या काही स्थानिक नेत्यांनी त्यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. यात विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा समावेश होता. त्यांची मुलगी शिवानी वडेट्टीवार यांनी चंद्रपूर मतदारसंघावर दावा ठोकला होता.



यावरून मोठे मतभेद काँग्रेसमध्ये निर्माण झाले होते. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे धानोरकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. धानोरकर कुटुंबीयांची लोकप्रियता आणि जातीय समिकरण बघून सुधीर मुनगंटीवार यांची निवडणूक लढण्याची इच्छा नव्हती. मात्र पक्षाचा आदेश झाल्याने त्यांचा नाईलाज झाला.

काँग्रेसचा चंद्रपूरचा विजयाची खात्री होती. शेवटी अपेक्षित असाच निकाल काँग्रेसच्या बाजूने लागला. धानोरकर यांना ७ लाख ४२ हजार ८ तर मुनगंटीवार यांना ४ लाख ५० हजार ८५२ मते पडली. सुमारे अडीच लाखांच्या मताधिक्यांनी प्रतिभा धानोरकर निवडूण आल्या आहेत. विशेष म्हणजे मतमोजणीच्या सर्व फेऱ्यांमध्ये त्या आघाडीवर होत्या.

## गांधीनगरमधून अमित शाह यांचा बंपर विजय, ७ लाख मताधिक्याने हरवले

**गांधीनगर । वृत्तसंस्था**

देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा लोकसभा निवडणूक २०२४मध्ये प्रचंड बहुमताने विजय झाला आहे. अमित शाह यांनी गांधीनगरल लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवला आहे.

निवडणुकीचे यंदाचे निकाल भले भाजपा आणि एनडीएनुसार राहिलेले नाहीत. मात्र गुजरातच्या गांधीनगर मतदारसंघातून अमित शाह यांनी कमाल केली आहे. या जागेवरून अमित शाह यांनी आपलाच जुना रेकॉर्ड मोडीत काढत ७,४४७,१६ मतांनी विजय मिळवला आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत अमित शाह यांनी या जागेवरून ५ लाख मतांनी विजय मिळवला होता. याआधी गांधीनगर मतदारसंघातून अडवाणी यांनी ४.८३ लाख मतांनी विजय मिळवला होता.




गेल्या ३५ वर्षांपासून गांधीनगर मतदारसंघ भाजपच्या ताब्यात आहे. अमित शाह यांच्याआधी या जागेवरून लालकृष्ण अडवाणी निवडणूक लढवत होते. त्यामुळे ही जागा भाजपसाठी अतिशय सुरक्षित मानली जात होती. अडवाणी या जागेवरून ६ वेळा निवडणूक जिंकले आहेत. २०१९ पासून अमित शाह या ठिकाणाहून निवडणूक लढवत आहेत. अमित शाह यांनी गांधीनगर येथून दुसऱ्यांदा प्रचंड विजय मिळवला आहे. अमित शाह यांच्याविरोधात गांधीनगर मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार सोनल पटेल उभे होते. गांधीनगर मतदारसंघातून अमित शाह मोठ्या विजयाच्या दिशेने जात आहेत.

## पश्चिम बंगालमध्ये ममतांची जादू कायम; भाजपला गेल्यावेळे इतक्याही राखता आल्या नाहीत जागा

**दिल्ली । वृत्तसेवा**

पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या ४२ जागांसाठी मोठेच राजकीय घमासान झाले. ममतांचा गड काबिज करण्यासाठी भाजपने येथे मोठीच ताकद लावली होती, पण तरीही या राज्यावरील आपली पकड मजबूत ठेवण्यात ममतादिदी यशस्वी ठरल्या असून त्यांनी ४२ पैकी ३० जागांवर यश मिळवले आहे.

भाजपला येथे गेल्या लोकसभा निवडणुकी इतकीही कामगिरी करता आली नाही. त्यांना यंदा ११ जागा मिळण्याची शक्यता आहे. सन २०१९ च्या निवडणुकीत भाजपला पश्चिम बंगालमध्ये एकूण १८ जागा मिळाल्या आहेत. यावेळी किमान २५ जागा मिळवण्याचे त्यांचे लक्ष होते. पण ते स्वप्न अधुरेच राहिले.

या निवडणुकीत संदेशखलीतील हिंसक



प्रकाराचे मोठे राजकीय भांडवल भाजपने केले होते. त्यामुळे यावेळी येथील निवडणूकीचे वातावरण फिरणार असल्याचे भाकीत केले गेले परंतु तेही खोटे ठरले आहे. सायंकाळपर्यंत हाती आलेल्या निकालाच्या स्थिती नुसार डायमंड हार्बर मतदार संघातून ममतांचे भाचे व तृणमुल काँग्रेसचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी प्रचंड मोठ्या फरकाने विजयी झाले आहेत.

त्यांनी भाजपचे प्रतिस्पर्धी अभिजीत दास यांचा ७ लाखांपेक्षा अधिक मतांनी पराभव केला. आसनसोल मतदार संघात तृणमुल काँग्रेसचे उमेदवार अभिनेते शत्रुघ्न सिन्हा यांनी आपले प्रतिस्पर्धी भाजपचे उमेदवार सुरेंद्र सिंह यांचा मोठ्या मतांनी पराभव केला. जोयानगर मतदार संघात तृणमुलच्या उमेदवार प्रतिमा मंडल या साडेतीन लाखांपेक्षा अधिक मतांनी विजयी झाल्या आहेत.

विष्णुपुर मतदार संघात भाजप आणि तृणमुल उमेदवारांमध्ये चांगलीच चुरस दिसून आली. तृणमुल काँग्रेसच्या बहुचर्चीत उमेदवार महुओ मोईत्रा यांनी प्रचंड मताधिक्क्यांनी कृष्णनगर मतदार संघातून विजयी झाल्या आहेत. सायंकाळी सात वाजता त्यांचे मताधिक्या सहा लाख मतांपेक्षा अधिक होते.

## कुणबी मराठा महासंघाच्या तालुकाध्यक्षपदी रोहन गलांडे

### समाज सेवेची दखल घेत करण्यात आली निवड

**केज । प्रतिनिधी**

अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य रोहन गलांडे पाटील यांनी आतापर्यंत निस्वार्थपणे केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. प्रल्हाद गुळमिले पाटील यांच्या सूचनेवरून व बीड लोकसभा अध्यक्ष रमेश साखरे यांच्या सुचनेनुसार अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाच्या केज तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली रोहन दादा गलांडे पाटील यांची निवड करण्यात आली आहे. अखिल



भारतीय कुणबी मराठा महासंघाच्या माध्यमातुन समाजातील विविध प्रश्न लोकशाही मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न करत अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाची विचारधारा व कार्यपध्दती यशस्वीपणे पार पाडेल असे मत रोहन गलांडे पाटील यांनी व्यक्त केले तसेच संघाच्या निवड पत्रात असे म्हटले आहे की अपेक्षा करत सदर नियुक्ती ही नियुक्ती दिनांकापासुन एक वर्षाच्या कालावधीसाठी असेल.अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे नियम व अटीच्या अधिन राहुन आपण काम करेन असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे तरी रोहन गलांडे पाटील यांचे विविध स्तरांवरुन अभिनंदन करण्यात येत आहे तरी रोहन गलांडे यांनी असे म्हटले आहे की सकल मराठा समाजा साठी तीळ भर आजपर्यंत समाजासाठी काम करत अलेलोच आहे, आणि इथून पुढेही करतच राहणार, समाजासाठी कधीही हजर राहणार, तुम्ही माझ्यावर विश्वास दाखवून मला अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष पद देवून माझ्यावर जबाबदारी टाकली आहे, त्या जबाबदारीला कर्तव्य समजून सकल मराठा समाजसाठी कामकरणार हे आज मी सकल मराठा समाजला वचन देतो. तुम्ही माझ्यावर प्रेम दाखवल त्याबद्दल अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्राज्यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा आभारी आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

cmyk

# देशातील साखर उत्पादनात १० लाख टनांनी घट

## महाराष्ट्राची जोरदार मुसंडी

पुणे : देशभरातील एकूण ५३४ कारखान्यांपैकी तामिळनाडूतील तीन कारखान्यांचा अपवाद वगळता, २०२३-२४ च्या ऊस गाळप हंगामाची ३१ मेअखेर सांगता झाली आहे. त्यानुसार यंदा देशात एकूण ३१३७.८० लाख टन उसापासून ३१६.७० लाख टन साखर उत्पादन झाले आहे. उसाचे गाळप गतवर्षीच्या तुलनेत १७९ लाख टनांनी कमी झाले आहे. तर साखरेचे उत्पादनही गेल्या वर्षाच्या तुलनेत १० लाख टनांनी घटले आहे.

देशात यंदा महाराष्ट्राने साखर उत्पादन पहिला क्रमांक पटकावला असून, राज्यात ११०.२० लाख टन उत्पादन झाले आहे. त्यानंतर उत्तर प्रदेशने १०३.६५ लाख साखरेचे उत्पादन घेतले आहे. तमिळनाडू आणि कर्नाटक राज्यांतील विशेष गाळप हंगामदेखील सप्टेंबरपर्यंत चालणार असून, त्यातून तयार होणारे अपेक्षित साखर उत्पादन लक्षात घेऊन यंदाच्या हंगामअखेर देशपातळीवर एकूण ३२१.२५ लाख टन इतके निव्वळ साखर उत्पादनाची अपेक्षा आहे. तर २१ लाख टन साखर इथेनॉल निर्मितीकडे



वळविली जाणार आहे. यंदा देशात एकूण ३१३७.८० लाख टन उसाचे गाळप झाले असून, ते गतवर्षीच्या तुलनेत १७९ लाख टनांनी कमी आहे. तसेच निव्वळ साखरेचे उत्पादनदेखील गतवर्षीपेक्षा ९.६५ लाख टनांनी कमी राहण्याचा अंदाज आहे. मात्र, यंदा देशपातळीवर सरासरी साखर उतारा १०.२० टक्के मिळाला असून, तो गेल्या वर्षी पेक्षा ०.२६ टक्क्याने जास्त आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या यंदा पर्जन्यमान सर्वदूर आणि समाधानकारक राहण्याचा अंदाज असून, त्याचा फायदा उसाच्या वाढीसाठी तसेच आडसाली आणि पूर्व हंगामी ऊस लागवडीसाठी फायदेशीर ठरणार आहे.

राज्यनिहाय साखर उत्पादन :

यंदा महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक ११०.२० लाख टन साखर उत्पादन झाले आहे. त्यानंतर अनुक्रमे उत्तर प्रदेश १०३.६५ लाख टन, कर्नाटक ५२.६० लाख टन, गुजरात ९.२० लाख टन, तमिळनाडू ८.८५ लाख टन, बिहार ६.८५ लाख टन, पंजाब ६.२० लाख टन, हरीयाणा ५.९० लाख टन, मध्य प्रदेश ५.२० लाख टन, उत्तराखंड ३.१० लाख टन, आंध्र प्रदेश १.६० लाख टन तर उर्वरित राज्यांमध्ये १.५० लाख टन साखर उत्पादन नोंदवले गेले आहे.

## शेतमालाला जीआय मानांकन घेण्यासाठी योजनांचा लाभ घ्या



राज्यात विविध प्रदेशानुसार तेथील प्रसिद्ध असलेल्या मालाला भौगौलिक चिन्हांकन म्हणजेच मानांकन मिळत असते. भौगौलिक चिन्हांकन मिळालेल्या मालाला विशेष महत्त्व समजले जाते. तर त्या मालाचा दर्जाही वाढतो आणि विक्रीसही मदत होत असते. महाराष्ट्रामध्ये आतापर्यंत साधारण २८ शेतमालाला जीआय मानांकन मिळालेले आहे. ज्या शेतमालाला, फळ पिकांना, भाजीपाला पिके, मसाला पिके, कृषी पिके आणि प्रक्रिया उत्पादनांना जीआय मानांकन मिळालेले आहे अशा उत्पादनाच्या विक्रीमध्ये वाढ होण्यासाठी आणि शेतकऱ्यांना माल विक्रीत प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून काही योजना राबवण्यात येत आहेत.

योजनांचे उद्दिष्टे : भौगोलिक चिन्हांकन/मानांकन संदर्भातील माहिती सर्व घटकापर्यंत पोहोचवणे. उत्पादकांना नोंदणीसाठी प्रोत्साहित करणे व नोंदणीचे आवश्यकते बाबतची माहिती उत्पादकांना देणे. भौगोलिक मानांकन उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविणे. यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून राज्यातील भौगोलिक मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांचे प्रचार, प्रसिद्धी, नोंदणी व मुल्यसाखळी विकसित करण्यासाठी ४ स्वतंत्र अर्थ सहाय्याच्या योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. योजना क्र. १ - भौगोलिक चिन्हांकन / मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांचे प्रचार व प्रसिद्धीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजनासाठी अनुदान योजना

लाभार्थी : भौगोलिक मानांकन प्राप्त उत्पादनांची मालकी असणाऱ्या संस्था. लाभाचे स्वरूप एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजनासाठी कमाल मर्यादा रूपये रू १०,०००/- प्रति प्रशिक्षण (किमान १०० शेतकऱ्यांसाठी)

योजना क्र. २ - भौगोलिक चिन्हांकन / मानांकन नोंदणीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता नोंदणी शुल्कासाठी अनुदान. योजना लाभार्थी : भौगोलिक मानांकन प्राप्त उत्पादनांची मालकी असणारी संस्था.

लाभाचे स्वरूप : भौगोलिक मानांकन नोंदणीसाठी प्रति शेतकरी रु. २००/- अनुदान संबंधित कृषि उत्पादनाचे मालकी असणार्या संस्थेला देण्यात येईल. योजना क्र. ३ - भौगोलिक चिन्हांकन / मानांकन नोंदणी प्राप्त उत्पादनांचे मुल्यसाखळी विकसित करण्यासाठी प्रोत्साहन अनुदान योजना. भौगोलिक मानांकन नोंदणीकृत नैसर्गिक गुणवत्ता असलेली उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहचवणे, भेसळीला प्रतिबंध करणे, विशिष्ट भौगौलिक क्षेत्रात उत्पादित होणारी उत्पादने चिन्हासह विक्री करण्यासाठी बाजार विकासा करिता (सुयोग्य पॅकिंग, लेबलिंग, ब्रँडींग, बारकोड, वेबसाईट विकास इ.) अर्थ सहाय्य करणे. लाभार्थी : भौगोलिक मानांकन प्राप्त उत्पादनांची मालकी असणारी संस्था. लाभाचे स्वरुपः उत्पादनांच्या बाजार विकासा करिता येणाऱ्या खर्चाच्या ५०% अथवा जास्तीत जास्त रक्कम रु.३,००,०००/- पर्यंत अर्थ सहाय्य संबंधित कृषी उत्पादनाचे मालकी असणार्या संस्थेला देण्यात येईल. योजना क्र. ४ - कृषि पणन मंडळाच्या फळे व कृषिमाल महोत्सव उपक्रमामधील भौगोलिक चिन्हांकन / मानांकन उत्पादनांच्या स्टॉलकरीता अर्थ सहाय्य योजना.लाभार्थी : भौगोलिक मानांकन प्राप्त उत्पादनांची मालकी असणारी संस्था.

## राज्यात १९ कृषी सेवा केंद्रांवर धडक कारवाई

### २ कायमस्वरुपी रद्द, १२ केंद्र निलंबित

पुणे : खरीप हंगामाच्या तोंडावर राज्यात सध्या सर्वत्र बियाण्याच्या साठेबाजीला आणि काळ्या बाजाराला ऊत आला आहे. तर राज्यातील अनेक भागांमध्ये सध्या वाढीव दराने कृषी बियाणे विक्रीच्या घटना समोर येत आहेत. अनेक शेतकऱ्यांना सध्या बियाणे मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. या पार्श्वभूमीवर गेल्या आठवड्यात अकोला, बुलढाणा, यवतमाळ या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये कृषी विभागाकडून धडक कारवाई करण्यात आली आहे. अशातच आता धाराशिव जिल्ह्यात कृषी विभागाकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील १९ कृषी सेवा केंद्रावर कृषी विभागाने कारवाई केली आहे. यामध्ये २ कृषी सेवा केंद्र कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. तसेच १२ कृषी सेवा केंद्राचे परवाने निलंबित तर ५ केंद्राना सक्त ताकीद देण्यात आली आहे. या कृषी सेवा केंद्राच्या तपासणी दरम्यान ई-पॉस मशीन प्रमाणे बियाणे, खते साठा न जुळणे, परवान्यात समाविष्ट स्त्रोताव्यतिरिक्त इतर निविष्ठांची खरेदी विक्री करणे, साठा रजिस्टरला नोंद नसणे आदी कारणामुळे कारवाई झाल्याची माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकाऱ्यांनी अधिकृतरित्या दिली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांना वेळेवर बियाणे मिळत नसल्यामुळे तसेच वाढीव दराने बियाणे मिळत असल्याने यापुढे कृषी सेवा केंद्रांची तपासणी सुरूच राहणार आहे. दोषी विक्रेत्यांवर बियाणे/खते/किटकनाशके कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येणार आहे. खत विक्री केंद्राने शेतकऱ्यांना ज्यादा दराने विक्री करणे, लिंकिग न करणे, साठा रजिस्टर अद्यावत न करणे आदी सुचनांचे पालन न केल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा कृषी विभागाकडून देण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजनेसाठी ७५ कोटींच्या निधीस मान्यता!

पुणे : राज्यात २०१७-१८ पासून पाच वर्षांसाठी मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना ही पूर्णतः राज्य पुरस्कृत योजना सुरु करण्यात आली आहे. राज्यामध्ये अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत लघु, सुक्ष्म व मध्यम उद्योगांसाठी क्षेत्र मर्यादा विहीत करण्यात आली आहे. तसेच राज्यामध्ये ही योजना २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून पुढील ५ वर्षाकरिता म्हणजेच सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाअखेरपर्यंत चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच २०२४-२५ मध्ये ही योजना राबविण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती. यासाठी मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजनेसाठी २०२४-२५ मध्ये ७५००.०० लाख (पंचाहत्तर कोटी रुपये) इतक्या रकमेच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत तीन उप घटकांना अनुदानाचा लाभ मिळतो. यात कृषी व अन्न प्रक्रिया प्रस्थापना (नवीन प्रकल्प उभारणी), कार्यरत असलेल्या कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगाचे स्तर वृध्दी विस्तारीकरण व आधुनिकीकरण करणे, मूल्यवर्धन, शीतसाखळी आणि साठवणुकीच्या पायाभूत सुविधा निर्माण



करणे यासाठी अनुदान दिले जाते. हे अनुदान प्रामुख्याने शेतकरी, वैयक्तिक उद्योजक, बेरोजगार युवक, महिला, नव उद्योजक, ॲग्रिगेटर, भागीदारी प्रकल्प, भागीदारी संस्था, शेतकरी उत्पादक गट-संस्था-कंपनी, स्वयंसाह्यता गट, उत्पादक सहकारी संस्था, शासकीय संस्था व खासगी संस्थां या सर्वांना या योज़नेनंतर्गत अनुदानाचा लाभ मिळतो.

किती मिळते अनुदान?

मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत मशिनरीसह प्रक्रिया प्रकल्पांसाठी आवश्यक असणारे शेड किंवा इमारत बांधकामासाठी एकूण खर्चाच्या ३० टक्के अनुदान मिळते. हे अनुदान प्रामुख्याने अधिकाधिक प्रति शेतकरी किंवा प्रति व्यक्ती ५० लाख रुपयांपर्यंत मिळते.

याशिवाय राज्य सरकारच्या संस्थांकडून प्रशिक्षित कामगार निर्मितीसाठी प्रशिक्षण शुल्काच्या ५० टक्के आर्थिक साहाय्य देखील सरकारकडून दिले जाते. दरम्यान, वितरीत केलेला निधी तातडीने खर्च करावा. तसेच हा निधी बँक खात्यावर पडून राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. असे निर्देशही सरकारकडून देण्यात आले आहे.

# जपानी रेड डायमंड पेरुची अशी करा शेती

रेड डायमंड पेरु शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. या पेरुचा दर खूप जास्त असून, बाजारात १०० ते १५० रुपये किलोने विकला जातो. हा पेरु त्याच्यातील चव आणि गोडवा यासाठी खूप लोकप्रिय आहे. या पेरुची लागवड करून शेतकरी काही वर्षांत श्रीमंत होऊ शकतात.

भारतातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेतीऐवजी अपारंपारिक पिकांची लागवड करत आहेत. या प्रयत्नात ते यशस्वी होत आहेत आणि चांगली कमाई करत आहेत. बहुतांश शेतकरी विविध प्रकारच्या फळांची लागवड करतात. आजकाल रेड डायमंड पेरू देशातील शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. जपानी रेड डायमंड पेरुचा दर खूप जास्त आहे, त्यामुळे अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांनी या जातीच्या पेरुची लागवड करण्यास सुरुवात केली असून त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.

लाल डायमंड पेरुची लागवड पद्धती : रेड डायमंड पेरुच्या लागवडीसाठी १० अंश ते ४२ अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. परंतु तापमान थोडे कमी झाले तरी त्याचा उत्पादनावर परिणाम होत नाही. या जातीच्या पेरुच्या



लागवडीसाठी काळी किंवा वालुकामय चिकणमाती चांगली मानली जाते, तसेच जमिनीचा (सामू) ७ ते ८ असावी.

रोप लागवड आणि रोपातील अंतर : जपानी रेड डायमंड पेरुची रोपे लावताना तुम्हाला त्यांच्यामधील जागेची विशेष काळजी घ्यावी लागेल. एका ओळीपासून दुसऱ्या ओळीपर्यंतचे अंतर सुमारे ८ फूट ठेवावे आणि रोपापासून रोपापर्यंतचे अंतर ६ फूट ठेवावे. चांगल्या वाढीसाठी शेतकऱ्यांना वर्षातून दोनदा रोपांची छाटणी करावी लागते. जेव्हा त्याचे फळ चिकूच्या आकाराचे होते तेव्हा आपण ते फळ पिशवी किंवा वर्तमानपत्राने झाकून ठेवावे. असे केल्याने पेरू पिकण्याची प्रक्रिया सुधारते आणि फळांवर डाग दिसत नाहीत.

खत आणि सिंचन : रेड डायमंड पेरुची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांनी शेणखत आणि गांडूळखत यांचा पिकांमध्ये वापर करावा. याशिवाय, एनपीके सल्फर, मॅग्नेशियम सल्फेट, कॅल्शियम नायट्रेट आणि बोरॉन यासारखी रासायनिक खते वापरू शकता. रेड डायमंड पेरुच्या झाडांना पाणी देण्यासाठी शेतकरी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करतात. याशिवाय वेळोवेळी सामान्य सिंचन देखील आवश्यक आहे.

रेड डायमंड पेरू पासून होणारी कमाई : जपानी रेड डायमंड पेरू सामान्य पेरुसारखा दिसतो. पण आतून तो टरबूजासारखा लाल असतो आणि बाहेरून तो नाशपातीसारखा गोड असतो. बाजारपेठेत स्थानिक पेरुचा भाव ५० ते ६० रुपये प्रति किलो तर जपानी रेड डायमंड पेरू १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जातो. या पेरुची लागवड करून शेतकरी सामान्य पेरूपेक्षा ३ पट अधिक उत्पन्न मिळवू शकतात. या जातीच्या पेरुची लागवड करण्यासाठी खर्च सुद्धा कमी येतो.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### जागतिक पर्यावरण दिन
### जागतिक प्रजातीवाद विरोधी दिन

### महत्वाच्या घटना

१९०७ : स्वामीनारायण पंथाची स्थापना.
१९५२ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही सन्मान पदवी दिली.
१९१५ : डेन्मार्कमधे महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.
१९५९ : सिंगापूरमधील पहिल्या सरकारची स्थापना झाली.
१९६८ : अमेरिकेच्या अध्यक्षपदचे उमेदवार रॉबर्ट एफ. केनेडी यांचा गोळी मारण्यात आली, पुढील दिवशी केनेडी मरण पावले.
१९७५ : १९६७ पासून आठ वर्षे वाहतूकीसाठी बंद असलेला 'सुवेझ कालवा'पुन्हा आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुला करण्यात आला..
१९७७ : सेशेल्समधे उठाव झाला.
१९८० : भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक व ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे एक संस्थापक नारायण मल्हार जोशी यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीटाचे अनावरण करण्यात आले.
१९९४ : वेस्ट इंडिजच्या ब्रायन लाराने इंग्लिश कौटी क्रिकेट स्पर्धेत वॉरविकशायरकडून खेळताना नाबाद ५०१ धावा करून प्रथम दर्जाच्या क्रिकेटमध्ये नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित केला.
२००३ : पाकिस्तान आणि भारतामध्ये तीव्र उष्णतेची लाट आल्यामुळे तापमान ५० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त झाले.
२०१७ : जीएसएलवी मार्क ३ च्या पहिल्या विकसात्माक उड्डाणाच्या सहाय्याने इसरोने जीसैट-१९ चे सफलतापूर्वक प्रक्षेपण केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ते ॲडम स्मिथ . (मृत्यू: १७ जुलै १७९०)
१८७९ : भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक नारायण मल्हार जोशी . (मृत्यू: ३० मे १९५५)
१८८१ : हार्मोनियम वादक, अभिनेते व संगीतकार गोविंदराव टेंबे . (मृत्यू: ९ ऑक्टोबर १९५५)
१८८३ : ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जॉन मायनार्ड केन्स . (मृत्यू: २१ एप्रिल १९४६)
१९०० : डेनिस गॅबॉर, हंगेरीयन, ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९०८ : कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे सहसंस्थापक रवि नारायण रेड्डी . (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९१)
१९४५ : अंबर रॉय, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९४६ : विल्यम्स एफ टीम चे सहसंस्थापक पॅट्रिक हेड यांचा जन्म.
१९५० : हरिश्चंद्र माधव बिराजदार, मराठी पहिलवानी कुस्तीगीर.
१९६१ : भारतीय टेनिस खेळाडू आणि प्रशिक्षक रमेश कृष्णन.
१९७२ : भारतीय योगी आणि राजकारणी योगी आदित्यनाथ.


### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१६ : लॉर्ड होरेशियो किचनर, ब्रिटीश फील्ड मार्शल, भारताचा व्हाईसरॉय.
१९५० : कुस्तीगीर व प्रशिक्षक हरिश्चंद्र बिराजदार . (जन्म: १४ सप्टेंबर २०११)
१९७३ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर तथा श्री गुरूजी यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९०६)
१९९६ : भारतीय कवि आणि विद्वान आचार्य कुबेर नाथ राय . (जन्म: २६ मार्च १९३३)
१९८७ : ग. ह. खरे, इतिहासतज्ज्ञ.
१९९९ : राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे शाहूमहाराज भोसले .
२००४ : अभिनेते आणि अमेरिकेचे ४० वे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन (जन्म: ६ फेब्रुवारी १९११)

## वर्षाला २५० अंडी देणारी 'प्लायमाउथ रॉक' कोंबडी पाळा

शेतकरी जोड व्यवसाय म्हणून अनेक व्यवसाय करत उत्पन्न घेत असतात. या कृषिपूरक व्यवसायांपैकी कुक्कुटपालन व्यवसाय शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे. यातून शेतकरी वर्ग कमी खर्चात अधिक उत्पन्न काढू शकतो. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात घरोघरी केला जाणारा व्यवसाय म्हणजे कुक्कुटपालन. कुक्कुटपालन करून शेतकरी अंडी, आणि मांस उत्पादन करण्याचा व्यवसाय करून चांगले उत्पन्न घेऊ शकतात. कुक्कुटपालन व्यवसाय अगदी कमी पैशातही सुरू करू शकणारा व्यवसाय आहे. बरेचदा कुक्कुट पालकांना समजत नाही की त्यांनी कोणत्या जातीची कोंबडी पाळावी. यासाठी 'प्लायमाउथ रॉक' कोंबडीची शिफारस केली जाते. 'प्लायमाउथ रॉक' कोंबडी ही एका वर्षात २५० पर्यंत अंडी घालू शकतात, त्यामुळे शेतकऱ्यांना बंपर नफा मिळवून देऊ शकते. या कोंबडीच्या एका अंड्याचे सरासरी वजन ६० ग्रॅम पर्यंत असते.

'प्लायमाउथ रॉक' कोंबडीची वैशिष्ट्ये : या कोंबडीचे वजन ३ किलोपर्यंत असते. या कोंबडीचे कान लाल असतात, तर चोच



पिवळी असते. ही कोंबडीची अमेरिकन जात मानली जाते. तरीही भारतातील अनेक राज्यांमध्ये ते मुबलक प्रमाणात आढळते. व्यवसायाच्या दृष्टीने, कोंबडीची ही जात भारतात खूप चांगली मानली जाते. प्लायमाउथ रॉक चिकन भारतातील प्रत्येक राज्यात आढळते. या कोंबडीला 'रॉक बॅरेड रॉक' या नावाने सुद्धा ओळखले जाते. या कोंबडीचे मांस देखील अतिशय चवदार आणि आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर मानले जाते. त्यामुळेच त्याच्या मांसाची किंमत बाजारात जास्त असते. शेतकरी बंधुंनो तुम्ही सुद्धा कोंबडी पालन व्यवसाय करू इच्छित असाल किंवा नवीन प्रजातीची कोंबडी पालन करणार असाल तर 'प्लायमाउथ रॉक' कोंबडी एक चांगला पर्याय आहे.

# माजलगावात भरदिवसा दोन सख्या भावांची घरे फोडली ; सव्वा दोन लाखांचा ऐवज लंपास

## तिसऱ्या मजल्यावर भरदिवसा धाडसी चोरी; तिसरे घर फोडण्यात चोरटे अयशस्वी पोलिसांसमोर चोरांना शोधण्याचे तगडे आव्हान; नागरिकांत भीतीचे वातावरण





माजलगाव / प्रतिनिधी:

शहरातील संभाजी नगर मध्ये असलेल्या दुगड अपार्टमेंट येथे सोनार राजेश्वर कुलथे व रामेश्वर कुलथे हे दोन सख्खे भाऊ तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र.१९ व २० मध्ये समोरा-समोर राहतात. यातील राजेश्वर कुलथे हे त्यांच्या घरच्यांसोबत लग्नासाठी परभणी येथे गेलेले होते व त्यांचे मोठे भाऊ रामेश्वर कुलथे हे दुकानावर गेलेले असल्यामुळे दोन्हीही घराला कुलूप लावलेले होते. याचवेळी सोमवारी दि.०३ जून २०२४ रोजी सायंकाळी ५ ते ८ दरम्यान घरी कोणी नसल्याचा फायदा घेत या दोनही सख्या भावांची घरे फोडून एकूण २ लाख २४ हजारांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केल्याची तक्रार राजेश्वर राधाकिसन कुलथे यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. तसेच याचवेळी चौथ्या मजल्यावरील डॉ.शिंदे यांच्या फ्लॅट क्र.२३ च्या हि कुलुपाला चोरांनी घर फोडण्यासाठी झटले परंतूहे कुलूप तोडण्यात चोरटे अयशस्वी ठरल्याची हि माहिती मिळाली आहे.

याबाबत अधिक माहिती आशी कि, तक्रारदार हे त्यांच्या पत्नी,मुले व भावजाई यांच्यासह रविवारी दि.०२ जून २०२४ रोजी सायंकाळी ७.०० वा. परभणी येथे पाहुण्याचे लग्न असल्याने लग्नासाठी गेलेले होते. व त्यांच्या दोन्ही घराला कुलूप होते. यानंतर दि.०३ जून २०२४ रोजी सायंकाळी ८.३० वा. चे सुमारास तक्रारदार यांना त्यांचा पुतण्या व्यंकटेश रामेश्वर कुलथे याने फोन करून सांगितले की, आपल्या घराचे कुलूप उघडे आहेत व आतील सामान अस्ताव्यस्त पडलेले आहेत. यानंतर तक्रारदार हे रात्री ११.०० वाजत परभणी येथून माजलगावला परत आले तेंव्हा पाहिले असता दोन्ही घराचे कुलूप हे कटर व तांबी किंवा लोखंडी रॉडने तोडले असल्याचे दिसले तेच घरात जाऊन पाहीले असता तक्रारदार व त्यांचे सख्खे मोठे भाऊ रामेश्वर राधाकिसन कुलथे यांच्या दोन्ही दरवाज्याचे कुलुप तुटलेले दिसले यानंतर त्यांनी व घरातील व्यक्तींनी आत जाऊन पाहीले असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले व कपाटाचे कुलूप तुटलेले दिसले व कपाटामध्ये ठेवलेले. रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून घेऊन गेले असल्याचे दिसले. यानंतर त्यांनी माजलगाव शहर पोलीस ठाणे येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली असता तक्रारदार यांचे सोन्याचे देवता कॉईन ३ नग १५ ग्रॅम किं अं ९०००० रुपये, सोन्याची नथ दोन ग्रॅम कि अं १८००० रुपये, सोन्याची मोरनी १२ नग ३.५०० ग्रॅम किं अं २१००० रुपये, चांदीचे बाजुबंद २५ ग्रॅम किं अं २००० रुपये, सोन्याचे देवता, लक्ष्मीपुजन पैसे रोख रक्कम १५००० रुपये, असा एकूण १६१०००/- रुपयाचा मुद्देमाल तसेच तक्रारदार यांचे मोठे भाऊ रामेश्वर राधाकिसन कुलथे यांच्या घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे मनी डोरले २.५०० ग्रॅम किं अं १५००० रुपये,सोन्याचे मनी गंठन ५ ग्रॅम किं अं ३०००० रुपये, सोन्याची नथ ४ नग ३.५०० ग्रॅम कि अं २१००० रुपये, चांदीची मुर्ती लक्ष्मी २५ ग्रॅम किं अं २००० रुपये, देवाचे पुजनचे रोख रक्कम १०००० असा एकुण किंमत २२४०००/- रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून चोरून नेल्याची घटना माजलगाव शहरातील संभाजी नगर येथील दुगड अपार्टमेंट येथे घडली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## थोडक्यात



### मुख्याध्यापक पदी संतोष लिंबकर यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी संतोष लिंबकर यांची निवड झाली असून, त्यांना शुभेच्छा देताना भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे.



### मोमीन बसरी, सिद्दीकी अरिबा यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

शहरातील के.एस.के. हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. सारिका व संचालक डॉ. योगेश क्षीरसागरांकडून के.एस.के. हॉस्पिटल बीड येथे मोमीन राबिया बसरी व सिद्दीकी अरिबा यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पुढील शिक्षणासाठी हृदयी शुभेच्छा देण्यात आल्या. मोमीन राबिया बसरी मोहम्मद वाजेद हिने मार्च-२०२४ ला घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परिक्षेत ९६.४० टक्के गुण घेऊन विशेष गुणवत्तेने यश प्राप्त केले व सिद्दीकी अरिबा रिज़वानोदीन (आमेर)हिने मार्च-२०२४ ला दहावी बोर्ड परिक्षेत ८८.२० टक्के विशेष गुणवत्तेने यश प्राप्त केल्याबद्दल के.एस.के हॉस्पिटल बीड येथे दोन्ही विद्यार्थिनींचा डॉ. सारिका यांनी शॉल व बुके देऊन सत्कार केले. या कार्यक्रमात डॉ. योगेश क्षीरसागर यांची विशेष उपस्थिती होती. सत्कार कार्यक्रमात मार्गदर्शक सिद्दीकी नवीद (प्राचार्य) नॅशनल उर्दू ज्युनियर कॉलेज बीड, (संचालक) रिज़वानोद्दीन सिद्धीकी (न.शि.सं, राजूरी), मोहम्मद वाजेद आणि मोहम्मद सलीम उपस्थित होते.

### धारूर तालुक्यात भारतीय सेनेकडून रोपवनास प्रारंभ

धारुर । प्रतिनिधी

भारतीय सेनेची कंपनी १३६ इको बटालियन ही तुकडी बीड जिल्ह्यात वृक्षआच्छादन व वनआच्छादन वाढविण्यासाठी कार्यरत आहे.२०२४-२५ ह्या वर्षी इको बटालियन मार्फत धारुर तालुक्यात किल्ले धारुर व घागरवडा येथे २२५००० वृक्षारोपण करण्यात येणार आहे. जागतीक पर्यावरण दिना पासून या वृक्षारोपनाचा शुभारंभ करण्या येणार आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे निमित्त साधून बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात भारतीय सेनेच्या इको बटालियन ने किल्ले धारुर व घागरवडा येथे ५००० वृक्षारोपण करून रोपवनास प्रारंभ केला.रोपवणाचे उद्धाटन धारुर दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती एन. एस कदम व मानवलोक सेवाभावी संस्थचे संचालक श अनिकेत लोहिया ह्यांच्या मार्फत करण्यात आले.ह्या प्रसंगी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किल्ले धारूर चे एनसीसी चे कॅसेट्स व एनएसएस चे विद्यार्थी, माजी सैनिक, प्रतिष्ठित नागरिक व मीडिया चे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

## उर्दूच्या भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न सुरूच राहतील-हसीन अख्तर




बीड । प्रतिनिधी

तंजीम तरक्की उर्दू ही गेल्या अनेक वर्षे उर्दू भाषा आणि साहित्याच्या अस्तित्वासाठी आणि हितासाठी प्रयत्नशील असलेली संस्था. संस्थेचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध कथालेखक आणि स्तंभलेखक सय्यद हसीन अख्तर उर्दूसाठी नेहमीच मोलाची पावले उचलतात. उर्दू भाषा आणि साहित्याच्या विकास आणि संवर्धनासाठी विविध उपक्रमांचे आयोजन हे यांचे वैशिष्ट्य आहे. नुकताच बारावीचा निकाल जाहीर झाला, त्या पार्श्वभूमीवर '' तंजीम तरक्की उर्दू '' संस्थेने उर्दू विषयात विशेष गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित केला होता.

एचएससी बोर्डात उर्दु विषयात ९६ गुण मिळवणारा विद्यार्थी पठाण फुरकान फिरोज खान, ९५ गुण मिळवणारी शेख अनम शेख एजाज, ९० गुण मिळवणारी पठाण गुलनाज खान गुलबाज खान यांच्यासह सय्यदा अयमान आरा सय्यद समीउद्दीन, शेख शगुफ्ता जबीन शेख अमजद आणि इतर विद्यार्थी यांचे प्रमाणपत्र, पदके, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन नव रंग प्रिंटिंग प्रेस परिसर येथे दुपारी ०१ वाजता सत्कार करण्यात आले. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना तंजीम तरक्की उर्दू संस्थेचे अध्यक्ष सय्यद हसीन अख्तर म्हणाले की, उर्दूच्या संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील आणि अधिक गतीने पावले उचलली जातील. यावेळी काझी मुजीबुर रहमान यांनी प्रास्ताविक केले, या वेळी तंजीम तरक्की उर्दू संस्थेचे सचिव डॉ.सिराज खान आरजू, नव रंग प्रेसचे मालक मिर्झा जफरउल्ला बेग, सोफटेक कॉम्प्युटर्सचे एमडी सय्यद रफिक, शासकीय कंत्राटदार मिर्झा शकील बेग, मौलाना आझाद विचार मंचचे जिल्हाध्यक्ष काझी मुजीबुर रहेमान, मिर्झा परवेज बेग, मिर्झा मजहर बेग आदी मान्यवर उपस्थित होते.

## माजलगावमध्ये गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन



माजलगाव । प्रतिनिधी

आज माजलगाव मध्ये लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचा प्रतिमेचे पुजन करून त्यांचा प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून अभिवादन करताना भारतीय जनता पक्षाचे भटके विमुक्त आघाडी महाराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर सरवदे धनगर आरक्षण कृती समितीचे माजलगाव तालुका अध्यक्ष अविनाश कांदुरे सुतार समाज तालुका अध्यक्ष परमेश्वर पांचाळ, सरवदे नाना राहुल जाधवर,बाबुराव तिडके जाधवर, शाम पांचाळ दंत रोग तज्ञ डॉ विलास मुंडे आबुज साहेब गणेश देशमुख मयुर पांचाळ इत्यादीची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे आयोजन तात्या पांचाळ यांनी केले होते.

## राष्ट्रीय फलोत्पादन विकास पंधरवडा निमित्त मेळावा

बीड । प्रतिनिधी

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये राज्यात अनुसूचित प्रवर्गाकरिता २०.८३ कोटी व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता रु. १८.७५ कोटी कार्यक्रम मंजूर झाला आहे. सदर प्रवर्गातील लाभार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज करण्याकरिता दिनांक १ जून २०२४ ते १५ जून २०४ या पंधरवड्यात क्षेत्रीय स्तरावरून गावपातळी पर्यंत विशेष मोहिम आयोजन करण्यात आले आहे.

नियोजन व अंमलबजावणी खालीलप्रमाणे कृषी सहाय्यकामार्फत प्रत्येक गावातील भौगालिक पीक परिस्थितीचा आढावा घेऊन अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विशेष मेळावा घेऊन महाडीबाटी प्रणालीवरील योजनेची व अर्ज करण्याची कार्यपद्धती याबाबत माहिती देण्यात येणार आहे एकात्मिक फलोत्पादन अभियानाची घटक निहाय माहिती, अर्थसहाय्य दर याचाबतची माहितीपत्रक, भित्तिपत्रिका छपाई करून शेतक-यांना गावोगावी वाटप करण्यात येतील. सदर मोहिमेमध्ये कृषि महाविद्यालय, कृषि विज्ञान केंद्र, अशासकीय संस्था इ. प्राधान्याने सहभागी करुन अनुसुचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतक-यांपर्यंत योजना पोहोचविण्याकरता स्थानिक वृत्तपत्रे, दूरदर्शन व आकाशवाणी इत्यादी माध्यमातून व्यापक प्रचार प्रसिद्धी करण्यात येणार आहे.अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतक-यांसाठी कमी गुंतवणूक असलेल्या घटकांसाठी अर्ज घेण्यात येणार आहेत.मोहिमेंतर्गत मेळाव्यास जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

## श्रीक्षेत्र कपिलधार येथे वैदिक शिबिर



बीड । प्रतिनिधी

बीड पासून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे जंगम मुलांसाठी श्री सद्गुरु मिस्कीन स्वामी संस्थान मठ यांच्या वतीने शिबिर घेन्यात आले हे शिबिर अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर सुरू करण्यात आले होते अगदी विनामूल्य घेतलेल्या या शिबिरात मुलांना घडवणे व परिपूर्ण करणे हाच एक हेतू होता या शिबिरात मंठा परभणी, कुरुंदा ,वसमत पाथरी बडूळ,देगलूर उदगीर सिल्लोड ,नांदेड ,धाराशिव धर्माबाद, माजलगाव सोलापूर, बिदर ,कोल्हापूर, सांगली, खानापूर, कळमनुरी, यवतमाळ, नाशिक मंठा एरंडेश्वर आधी भागातून मुले सहभागी झाली होती.

या शिबिरात मुलांना दररोज प्रार्थना रुद्राभिषेक व महापूजा कशी करावी याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला .त्यानंतर सर्वांना रुद्र पठन शिकवले आदर्श जंगम कसा असावा त्यांनी कोणते आचरण करावे व पूजा विधि कशा प्रकारे करावा अशा विविध विषयावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. शेवटी श्री मन्मथ थस्वामी यांना लघु रुद्राभिषेक व महापूजा करून शिबिराची सांगता झाली. या शिबिरात मुलांना नित्य पूजा पाठ शिकवणारे प्रदीप शास्त्री व प्रसाद शास्त्री सोलापूर महादेव स्वामी कपिलधार यांनी अथक परिश्रम घेतले. श्री मन्मथ स्वामी देवस्थान विश्वस्त अश्रूबा रसाळ, प्रा. पंडित रसाळ ,अनिल राऊत ,डॉ स्वामी प्रशांत, डॉ चंद्रशेखर स्वामी, सप्ताह समिती अध्यक्ष भालचंद्र पाटील ,विकास लांडगे, विजयकुमार मुसळे, विजयकुमार पाटील, धनेगाव ओंकार पंचाक्षरी, राजेश खानापूर, शिवाजी वाडीवाले ,नितीन शेटे ,राजाभाऊ लोखंडे, संजय मोगरकर शिवदास पेठकर, पिंटू कुरळे ,मनोहर जामकर, मन्मथ आप्पा कापसे, आग्रे गुरुजी ,संजय पाटील गुजर, शंकर पाटील ,शिवकांत स्वामी, दत्ता पाप्पेठकर यांच्यासह मान्यवर मंडळी यांचा सहभाग व उपस्थिती होती.

## भव्य रॅली, रांगोळीतून तंबाखूच्या दुष्परिणामाचा संदेश

### आदित्य दंत महाविद्यालयात तंबाखू विरोधी दिन साजरा




बीड । प्रतिनिधी

तंबाखू सेवन केल्याने होणारे दुष्परिणाम आदित्य दंत महाविद्यालयात विविध पोस्टर, रांगोळी आणि रॅलीच्या माध्यमातून दाखवण्यात आले. शिवाय महाविद्यालयात उपचारासाठी आलेल्या रुग्णांनाही तंबाखूपासून होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तंबाखू सेवण केल्याने आपण केवळ स्वत:च्या नव्हे तर संपूर्ण परिवाराच्या आरोग्याशी खेळत असल्याचा संदेश या रॅलीतून देण्यात आला. शहरातील आदित्य दंत महाविद्यालयात ३१ मे रोजी जागितक तंबाखू विरोधी दिन साजरा करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले होते.

आदित्य दंत महाविद्यालयात ३१ मे २०२४ रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा हे होते. कार्यक्रमाचे उदघाटन डॉ. आदिती सारडा यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. हिमांशु श्रीवास्तव, पब्लिक हेल्थ डिपार्टमेंटचे प्रमुख डॉ. निखत मॅडम व डॉ. मंगेश अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. डॉ. आदिति सारडा यांनी यावेळी मार्गदर्शन केले. तंबाखू सेवण केल्याने होणारे रोग, घातक आजार, भविष्यात होणारे दुष्परिणाम आणि वाढती मृत्यूची संख्या यावर जागरूकता आणणे या उद्देशाने हा कार्यक्रम साजरा करण्यात आला असल्याचे डॉ. आदिती सारडा म्हणाल्या. तंबाखू, बिडी, सिगारेट, गुटखा यांच्या आधीन होण्याचे प्रामाण तरूण वर्गात वाढले आहे. महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी वर्गाने तंबाखू सेवणापासून दुर राहण्याचा यशस्वी प्रयत्न केला. येणाऱ्या काळात आदित्य दंत महाविद्यालय तंबाखूपासून होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल जनजागृती करणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी आदित्य दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ हिमांशु श्रीवास्तव यांनी आभार प्रदर्शन केले.

राज्य लोकतंत्र
बुधवार दि.५ जून २०२४


# झोळी घेऊन निघून जा, हेच जनमत

## श्रीराम-बजरंगबली दोघांनीही मोदींना नाकारलं

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीतील पराभव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मान्य करावा. जनतेने मोदींना नाकारलं आहे. 'झोला लेकर जाईए', हाच जनादेश आहे. श्रीराम आणि बजरंगबली या दोघांनीही नरेंद्र मोदी यांना नाकारले आहे, अशा बोचऱ्या शब्दांत ठाकरे गटाचे खासदार यांनी भाजपवर टीकास्त्र सोडले. देशातील सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर संजय राऊत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी संजय राऊत यांनी भाजप आणि पंतप्रधान मोदी यांच्यावर सडकून टीका केली.

प्रभू श्रीराम आणि बजरंगबली कोणीही मोदींसोबत नाही. श्रीराम आणि बजरंगबली आमच्यासोबत आहेत. ज्या अयोध्येत राम मंदिर उभारण्यात आलं तेथील फैजापूर लोकसभा मतदारसंघातही भाजपचा पराभव



### संजय राऊतांनी भाजपच्या जखमेवर मीठ चोळलं

झाला. याचठिकाणी मोदींनी इव्हेंट केला होता, अनेक दिवस व्रत केले होते. पण देशाच्या जनतेने नरेंद्र मोदी यांना नाकारले आहे. जनतेने मोदींना फेअरवेल दिलंय, अशी टिप्पणी संजय राऊत यांनी केली.

इंडिया आघाडीन मोदी-शाहांच्या अहंकाराचा पराभव केला: संजय राऊत

२०१४ ते २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने पूर्ण बहुमत मिळवले होते. पण २०२४ च्या निवडणुकीत भाजपला बहुमत मिळाले नाही. या निवडणुकीत मोदी आणि अमित शाहांचा पराभव झाला. राहुल गांधी, शरद पवार, ममता बॅनर्जी, स्टॅलिन या सगळ्यांनी जीवतोड मेहनत केली. या लढाईत मोदी-शाहांचा अहंकार इंडिया आघाडीने संपवला. आता त्यांची धावपळ सुरु झाली आहे. सरकार स्थापन करण्यासाठी आमच्यासोबत या, यासाठी ते हातापाय जोडत आहेत. यानंतरही मोदी-शाहांनी तोडफोड करुन सरकार स्थापन केले तर लोक संतापून रस्त्यावर उतरतील. मोदींचं नाक कापलं गेलंय, त्यांनी भाजपच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारुन राजीनामा द्यायला पाहिजे. आधी भाजप ४०० पारची भाषा करत होते, मग हा आकडा ३५० पर्यंत खाली आला, पण भाजपला २५० जागाही मिळाल्या नाहीत. मुंबईत आणि महाराष्ट्रात मोदींना आम्ही रोखलंय, असे संजय राऊत यांनी म्हटले.

### मुंबईत भाजपचे ढोलताशे न वाजताच माघारी

उत्तर मध्य मुंबईत भाजपने जल्लोषासाठी आणलेले बँजो, ताशे न वाजवताच माघारी नेण्यात आले. मुंबईतील पराभवामुळे कार्यकर्ते देखील शांत आणि दुःखी दिसत होते. उत्तर मध्य मुंबईच्या भाजप पदाधिकाऱ्यांनी एकीकडे मतमोजणी आणि दुसरीकडे जल्लोषाची तयारी केली होती. मात्र, चुरशीच्या झालेल्या लढतीत काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी बाजी मारली. त्यामुळे जल्लोषासाठी आणलेले ढोल-ताशे वाजलेच नाहीत. या निकालानंतर कार्यकर्ते देखील नाराज झाले.

# ३ लाख १६ हजारांची लीड घेणारे ओमराजे राज्यात दुसरे

## सर्वाधिक मताधिक्य घेणारा पहिला उमेदवार कोण?

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकांमध्ये देशात इंडिया आघाडीला व राज्यात महाविकास आघाडीला मोठं यश मिळालं आहे. महाराष्ट्रातील ४८ जागांपैकी महाविकास आघाडीने जवळपास ३० जागांवर विजयाच्या दिशेने वाटचाल केली आहे. त्यामध्ये, भाजपच्या अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाल्याचं पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रातील भाजपचे नेते व केंद्रीयमंत्री कपिल पाटील, मंत्री भारती पवार, यांसारख्या दिग्गजांना पराभवाचा फटका बसला आहे. तर, मंत्री रावसाहेब दानवे हेही पिछाडीवर आहेत. मात्र, राज्यात सर्वाधिक मताधिक्य घेतलेल्या उमेदवारांमध्ये भाजपचे मुंबई उत्तरचे उमेदवार पियुष गोयल यांचा पहिला नंबर लागतो. त्यामुळे, धाराशिवमध्ये पहिल्या फेरीपासून मताधिक्य घेणारे ओमराजे निंबाळकर हे दुसऱ्या क्रमांकावर गेले आहेत.

३ लाख १६ हजारांचा लीड घेणारे ओमराजे सर्वाधिक मताधिक्य घेणारे राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे उमेदवार ठरू शकतील. कारण, ओमराजे निंबाळकर यांच्यापेक्षा पियुष गोयल यांचं मताधिक्य अधिक आहे. अर्थात, अंतिम आकडेवारी येणे बाकी आहे. उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघात भाजपाचे उमेदवार पीयूष गोयल यांनी सर्वात मोठा विजय मिळवला आहे. ते महाराष्ट्रात सर्वाधिक मताधिक्य घेणारे भाजपचे उमेदवार ठरले आहेत. गोयल यांना सायंकाळी ६ वाजेपर्यंत ३ लाख ५२ हजार मतांचे मताधिक्य मिळाले आहे. त्यामुळे, तेच राज्यातील नंबर १ मताधिक्य घेणारे खासदार ठरू शकतील.



### ओमराजे निंबाळकरांचं मताधिक्य

**थेट जनतेशी संपर्क असलेल्या धाराशिव लोकसभा मतदारसंघातीलम महाविकास आघाडीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांनी आत्तापर्यंत हाती आलेल्या निवडणूक निकालांत मोठी आघाडी घेतल्याचं दिसून येत आहे. खासदार निंबाळकर यांनी महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांना तब्बल ३ लाख १६ हजार मतांनी पिछाडीवर टाकलं आहे, अद्यापही मतदारसंघात २ फेऱ्या बाकी आहेत. त्यामुळे, राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे मताधिक्य घेतलेले खासदार बनण्याचा मान ओमराजेंना मिळू शकतो.**

प्रतिभा धानोरकर :

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात सायंकाळी ६ पर्यंत झालेल्या मतमोजणीनंतर काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर २ लाख ५० हजार ७२६ मतांनी आघाडीवर आहेत. प्रतिभा धानोरकरांच्या विरोधात भाजपचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार उभे होते.

**श्रीकांत शिंदे**

ठाणे लोकसभा निवडणुकीत संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष कल्याण लोकसभा मतदारसंघाकडे लागलं होतं. कल्याणमध्ये मुख्यमंत्र्यांचे सुपूत्र आणि खासदार श्रीकांत शिंदे हेही जवळपास निश्चित झाला आहे. डॉ. श्रीकांत शिंदे यांना २ लाख ४७ हजार ५६४ मतांचं मताधिक्य असल्याचे दिसून येते

नरेश म्हस्के

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे नगरीत शिवसेनेच्या शिंदे गटाचे नरेश म्हस्के आणि शिवसेनेच्या ठाकरे गटाचे राजन विचारे यांच्यात थेट लढत झाली. त्यामध्ये, सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठाणे लोकसभेचे शिंदे गटाचे नरेश म्हस्के यांनी २ लाख १४ हजार मतांचा लीड घेतला आहे.

गोवाल पाडवी

महाविकास आघाडीचा पहिला विजय जवळपास निश्चित नंदुरबारमधून निश्चित झाला. येथील गोवाल पाडवी यांनी तब्बल १ लाख ५९ हजार मतांचे मताधिक्य घेऊन विजय मिळवला आहे. ◀◀ पान ३ वर

# कल्याणचा शिंदेंनाच कौल ! डॉ. श्रीकांत शिंदे दोन लाखांहून अधिक मतांनी विजयी

**कल्याण । प्रतिनिधी**

कल्याण-डोंबिवली लोकसभा मतदारसंघात श्रीकांत शिंदेंनी सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला आहे. ठाकरे गटाच्या वैशाली दरेकर यांचा तब्बल दोन लाखांहून अधिक मतांनी पराभव करत त्यांनी कल्याणवरील आपली पकड मजबूत केली आहे. मतमोजणी संपली तोपर्यंत श्रीकांत शिंदेंनी २ लाख ४० हजार मतांनी आघाडी मिळवली होती.

कल्याण लोकसभा मतदारसंघातील हायव्होल्टेज लढतीकडे देशाचे लक्ष लागले होते. कारण इथे शिवसेना ठाकरे गट विरुद्ध शिंदे यांच्या शिवसेनेत रणसंग्राम पाहायला मिळाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे यांच्याविरोधात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने महिला नेतृत्वावर जबाबदारी सोपवली.

परंतू, महायुतीकडून श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी



जाहीर करायला उशीर झाला. भाजप नेत्यांकडून श्रीकांत शिंदे यांच्या उमेदवारीला विरोध असल्यामुळे उमेदवारी जाहीर करण्यात उशीर झाल्याचे बोलले जात होते. दरम्यान मुख्यमंत्र्यांचे पुत्र खासदार श्रीकांत यांच्याविरोधत शिवसेना तगडा उमेदवार देईल, अशी आशा असताना ठाकरे गटाने वैशाली दरेकर या नवख्या नेतृत्वाला संधी दिली.

त्यामुळे श्रीकांत शिंदेंचा विजय सोप झाल्याचे बोलले जात आहे. मतदारसंघातील अपुरी कामे, महायुतीतील अंतर्गत वाद याशिवाय कळवा-मुंब्रामधून होणारा विरोध, हे सर्व चित्र पाहता ही निवडणूक जिंकणं श्रीकांत शिंदे यांच्यासमोर आव्हान असल्याचे म्हटले जात असताना, त्यांनी आता एकतर्फी विजय मिळवला आहे. कल्याण लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये शिवसेना उमेदवार श्रीकांत शिंदे यांनी २०१९ मध्ये सलग दुसर्यांदा विजयी मिळवला होता. श्रीकांत शिंदे यांनी ५,५९,७२३ मते मिळवून विजय मिळवला होता. तर राष्ट्रवादीचे उमेदवार बाबाजी पाटील यांना २,१५,३८० मते मिळाली होती. त्याशिवाय, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संजय हेडाऊ यांनी ६५,५७२ मते मिळवली होती.

# लोकसभा निवडणूक जनता विरुद्ध मोदी, हा पंतप्रधानांचा नैतिक पराभव -पृथ्वीराज चव्हाण

**सातारा । प्रतिनिधी**

२०२४ची लोकसभा निवडणूक जनता विरुद्ध मोदी अशी होती. मोदींनी स्वतः ला देशापेक्षा स्वतःला मोठे समजले. मी म्हणजेच ह्या देशात सर्व चालणार या अविर्भावात प्रचार केल्याने भाजपला बहुमत मिळाले नसल्याने हा मोदींचा नैतिक पराभव असल्याची टीका माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे.

यावेळी बोलताना आ. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, काँग्रेस पक्षाने जनतेचे मुद्दे घेऊन प्रचार केला तर मोदींनी जाती धर्माचे राजकारण केले, कोणतेही विकासाचे मुद्दे न घेता द्वेषपूर्ण



प्रचार करीत देशातील वातावरण बिघडविण्याचे काम नरेंद्र मोदींनी केले. देशातील पहिले पंतप्रधान असतील ज्यांनी प्रचारातच स्वतःच्या नावाने प्रचार केला, काही निवडणुकीत तर देवाचा अवतार असून आईच्या पोटी जन्म न घेता माझा थेट पृथ्वीवर जन्म झाले असल्याचे हास्यास्पद विधान केले होते. मोदींचे ध्रुवीकरणाचे राजकारण जनतेने नाकारले आहे. महाराष्ट्रात अत्यंत अपेक्षितच निकाल लागला असून भाजप च्या फोडाफोडीच्या राजकारणाला जनतेने जागा दाखवली आहे.

साताराच्या निकालाबाबत आ. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले कि, सातारा लोकसभेचा निकाल अत्यंत धक्कादायक निकाल आहे. सातारा हा पुरोगामी विचारांचा जिल्हा आहे. सर्व विधानसभा मतदारसंघात अत्यंत चांगला प्रचार केला गेला होता. एकजुटीने सर्वांनी प्रचार करूनही झालेला पराभव धक्कादायक आहे.

दरम्यान सातारा लोकसभा मतदारसंघातून श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांचा झालेला विजय, हा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विचारांचा विजय आहे. सातारा लोकसभेतील उदयनराजेंच्या विजयामुळे सातारा जिल्ह्यातील जनतेने नरेंद्र मोदींना देशात पुन्हा सत्तेवर बसविण्यासाठी पाऊल उचलले आहे. तसेच साताऱ्यात कधीच भाजपचा खासदार निवडून येणार नाही, असे म्हणणाऱ्या प्रवृत्तींना, जिल्ह्यातील समस्त जनतेने या निकालाने सणसणीत चपराक दिली आहे.

# मोदी-शाहांना देशाने नाकारलंय, राहुल गांधींची आक्रमक प्रेस, जाताजाता सत्तास्थापनेची हिंट दिली

नवी दिल्ली । वृत्तसेवा

नरेंद्र मोदी आणि अमित शाह या जोडगोळीने देश चालवू नये, ही तमाम जनतेची इच्छा आहे, हे आजच्या निकालातून स्पष्ट झाले आहे. आजचा निकाल ही परिवर्तनाची नांदी आहे. आम्ही कोणत्याही एका पक्षाविरोधात निवडणूक लढलो नाही तर बेकायदा वागणाऱ्या संस्थांविरोधात आम्ही निवडणूक लढलो. आमची लढाई संविधान वाचविण्याची होती. दलित, मुस्लीम, आदिवासी आणि गोरगरीब लोकांनी संविधान वाचविण्याच्या लढाईत सर्वाधिक योगदान दिले आहे. देशाने मोदी-शाहांना नाकारल्यानंतर आम्ही इंडिया आघाडी म्हणून जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करू, असे सांगत काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी



यांनी इंडिया आघाडीच्या सरकार बनविण्याच्या हालचाली सुरू असल्याचे अप्रत्यक्ष संकेतच दिले.

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक निकालात इंडिया आघाडीने नेत्रदीपक यश मिळवून भाजपचा विजयी वारू रोखला. ज्या उत्तर प्रदेशकडून भाजपला सर्वाधिक अपेक्षा होत्या, तिथेच समाजवादी पक्षाने भाजपला धक्का देऊन सर्व स्वप्ने धुळीस मिळवली. अगदी राममंदिराचा कोणताही परिणाम उत्तर प्रदेशमध्ये झाला नाही. देशभरात इंडिया आघाडीने जवळपास २३५ जागा जिंकल्या आहेत. या सगळ्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काँग्रेस मुख्यालयात पत्रकार परिषद घेऊन पुढील दिशा स्पष्ट केली.

देशाने आज परिवर्तनाच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल टाकलेय

राहुल म्हणाले, ''मोदी-शाहा यांनी देश चालवू नये, ही जनतेची इच्छा आहे. आजच्या निकालातून तेच स्पष्ट झालेय. आम्ही कोणत्याही पक्षाविरोधात लढत नव्हतो तर संस्थांविरोधात आम्ही दोन हात करत होतो. संविधान वाचविण्याची आमची लढाई होती. देशाने आज परिवर्तनाच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल टाकलेय''

जनतेने मोदी शहांना नाकारल्यानंतर इंडिया आघाडी आता दिलेली आश्वासने पूर्ण करेन

''इंडिया आघाडीच्या वाट्याला आलेले यश हे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या आणि सहकारी पक्षाच्या कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांच्या अफाट मेहनतीचे यश आहे. निवडणूक काळात त्यांनी केलेल्या मेहनतीचे चीज झाले. जनतेने मोदी शहांना नाकारल्यानंतर इंडिया आघाडी आता जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करेन'', असे राहुल गांधी म्हणाले.

# ना लेकाला निवडून आणता आलं ना पत्नीला अजित पवारांच्या पदरी पराभवाची मालिका

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील सर्वात प्रतिष्ठेच्या बनलेल्या बारामती लोकसभा निवडणुकीमध्ये ( २०२४) शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे यांनी बाजी मारली. सुप्रिया सुळे यांनी त्यांच्या नणंद आणि अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा पराभव केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर पवारांचे होमग्राउंड कुणाच्या बाजूने याचं उत्तर या निवडणुकीतून मिळालं असून अजित पवारांसाठी हा धक्का असल्याचं मानलं जातंय. गेल्या निवडणुकीत मुलगा पार्थ पवारचा पराभव आणि आता पत्नी सुनेत्रा पवार यांचा पराभव अजित पवारांना पाहायला लागला. त्यामुळे अजित पवारांच्या पदरी



पराभवाची मालिका पडल्याचं चित्र आहे.

आधी मुलाचा पराभव

गेल्या निवडणुकीमध्ये अजित पवारांनी त्यांचा मुलगा पार्थ पवार यांना मावळ लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं होतं. पार्थ पवारांच्या नावाला खुद्द शरद पवारांचा विरोध होता असं सांगितलं जात होतं. त्याही परिस्थितीत अजित पवारांनी पार्थ पवारांना तिकीट दिली. पण शिवसेनेच्या संजय बारणे यांनी पार्थ पवारांचा पराभव केला होता. तो पराभव अजित पवारांच्या वर्मी लागल्याची चर्चा होती.

राष्ट्रवादीच्या फुटीनंतर अजित पवारांची शरद पवारांवर टीका

गेल्यावेळी राष्ट्रवादी पक्ष एकसंघ होता. पण यंदा परिस्थिती वेगळी होती. यावेळी अजित पवारांनी शरद पवारांपेक्षा भूमिका वेगळी घेतली आणि भाजपसोबत सत्तेत गेले. अजित पवार नुकतात सत्तेत गेले नाहीत तर शरद पवारांनी उभा केलेला पक्ष आणि चिन्ह स्वतःकडे घेतले.

एवढंच नाही तर अजित पवारांनी सुप्रिया सुळे यांच्याविरोधात उमेदवार देण्याची घोषणा केली. ◀◀ पान ३ वर

### बारामतीमध्ये शरद पवारच बॉस

ज्या शरद पवारांनी पक्ष स्थापन केला त्यांनाच न जुमानता, त्यांच्याच विरोधात भूमिका घेऊन स्वतःच्या पत्नीला निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची अजित पवारांची भूमिका बारामतीकरांना पसंत पडली नसल्याचं दिसून आलं. त्यामुळेच बारामतीकरांनी सुप्रिया सुळे यांच्या पदरात भरभरून मतदान केल्याचं दिसून आलं.

आपल्या राजकारणाची सुरूवात बारामतीमध्ये झाली असून गेल्या ६० वर्षांच्या काळात बारामतीकरांनी आपल्याला भरभरून दिल्याचं शरद पवारांनी या आधीही सांगितलंय. आता सुप्रिया सुळे यांना मिळालेल्या मताधिक्यामुळे शरद पवारांनी ही निवडणूक हलक्यात घेतली नसल्याचं स्पष्ट झालंय. त्यामुळेच आधी मुलाचा पराभव आणि आता पत्नीचा पराभव पाहायला लागलेल्या अजित पवारांच्या पदरी पराभवाची मालिकाच पडल्याचं दिसतंय.

# दिंडोरीत शरद पवारांचे शिलेदार भास्कर भगरे विजयी

## केंद्रीय मंत्री भारती पवारांना पराभवाचा धक्का...

**दिंडोरी । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीचे सर्व निकाल हळूहळू आता जाहीर होत आहेत. अनेक मोठ्या लढतींचे निकाल जाहीर झाले आहेत. महाराष्ट्रातीलही बऱ्याच ठिकाणचे निकाल जाहीर झाले आहेत. यामध्ये मोठे दिग्गज पराभूत झाले आहेत. पराभूत उमेदवारांमध्ये भाजपच्या भारती पवार यांचा समावेश आहे. दिंडोरी मतदारसंघातून त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

दिंडोरी लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसल्याचे दिसत आहे. भारतीय जनता पक्षाच्या दिंडोरी



लोकसभेच्या उमेदवार केंद्रिय मंत्री भारती पवार यांचा महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे यांनी लाखोंच्या मतांनी (१ लाख १३ हजार १९९) पराभव करत जायंट किलरची भूमिका निभावली आहे.

या लढतीत भास्कर भगरे यांनी सुरूवातीपासून बाजी मारत केंद्रिय राज्यमंत्र्यांचा पराभव करण्याचा पराक्रम केला आहे. भारतीय जनता पक्षासाठी हा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे. याठिकाणी अपक्ष उमेदवार बाबू भगरे यांनी १ लाख ०३ हजार ६३२ मते घेतली आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# कल्याणीनगर अपघात प्रकरणात आणखी दोघांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

कल्याणीनगरमधील अपघात प्रकरणात पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने दोघाजणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये आमदार सुनील टिंगरे यांचा निकटवर्तीय अश्पाक मकानदार याच्यासह दोघांना अटक करण्यात आली आहे. अपघात घडल्यानंतर येरवडा पोलीस ठाण्यात आणि त्यानंतर आरोपीच्या वैद्यकीय तपासणीदरम्यान हे दोन आरोपी ससून रुग्णालयात उपस्थित होते. त्यांनी पोलीस ठाण्यात आणि ससूनमधील कायदेशीर प्रक्रियेत हस्तक्षेप केल्याचा पोलिसांना संशय आहे. या दोघांना मुंबईमधून अटक करण्यात आल्याची माहिती गुन्हे शाखेकडून देण्यात आली.

अश्पाक बाशा मकानदार (वय ३६, रा. धानोरी), अमर संतोष गायकवाड (वय २७, रा. सुभाष नगर, नवी खडकी, येरवडा) अशी अटक आरोपींची नावे आहेत. कल्याणीनगरमध्ये रविवार, १९ मे रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास भरधाव पोर्शे कारची धडक बसल्यामुळे दोन आयटी अभियंत्यांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी आतापर्यंत तीन गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. पहिला गुन्हा १७ वर्षीय अल्पवयीन मुलावर दाखल करण्यात आला आहे. त्याच्यावर भादवि ३०४, ३०४ (अ), २७९, ३३८, ३३७, ४२७, मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५, १९९/१७७ अन्वये दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यामधील पुराव्यांमध्ये छेडछाड झाल्याचे समोर आल्यानंतर या प्रकरणात भादवि २०१, १२० ब, २१३, २१४, ४६७ या कलमांची वाढ करण्यात आली. पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी विशाल अगरवाल, ससूनचा फॉरेन्सिक विभागाचा प्रमुख डॉ. अजय तावरे, सीएमओ डॉ. श्रीहरी हाळनोर, अतुल घटकांबळे यांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर अल्पवयीन मुलाची आई शिवानी अगरवाल हिला देखील अटक करण्यात आली. या मुलाच्या वैद्यकीय तपासणीदरम्यान त्याच्या रक्ताचे नमुने बदलण्यात आले होते. त्याजागी शिवानी अगरवालचे नमुने घेण्यात आले होते.

डॉ. तावरे आणि डॉ. हाळनोर यांच्या प्रकरणात भ्रष्टाचार अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ), १३ मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५,११९/१७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेकडून सुरू आहे. या गुन्ह्याचा तपास सुरू असतानाच पोलिसांनी ससून रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले होते. त्याचा देखील तपास सुरू होता. आरोपी मकानदार आणि गायकवाड या दोघांनी अल्पवयीन आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलण्याचा कट रचला. आरोपी ऐवजी त्याच्या आईच्या रक्ताचे नमुने घेऊन गुन्ह्यामधील पुरावा नष्ट करण्याचा कट पुर्णत्वास नेल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. यापूर्वी अटक करण्यात आलेल्या आरोपींकडे पोलिसांनी केलेल्या चौकशीत मकानदार आणि गायकवाड या दोघांची नावे समोर आली होती. तसेच ससूनच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये देखील हे दोघे दिसून आलेले होते.

या चौकशीत बांधकाम व्यावसायिक आणि आरोपी अल्पवयीन मुलाचा वडील विशाल अगरवाल याने मकानदार आणि गायकवाड यांची मदत पुरावा नष्ट करण्यासाठी घेतली. त्यांच्या मदतीने ससून रुग्णालयामधील डॉ. अजय तावरे याच्याशी संपर्क साधला. त्याच्या मध्यस्थीने डॉ. श्रीहरी हाळनोर, कर्मचारी अतुल घटकांबळे या दोघांशी आर्थिक देवाणघेवाण केली. त्यांना रक्त नमुने बदलण्यासाठी तीन लाख रुपये देण्यात आले. त्यानंतर आरोपी अल्पवयीन मुलाच्या रक्ताच्या नमुन्यामध्ये बदल करण्यात आला. त्याऐवजी त्याची आई शिवानी अगरवाल हिचे रक्त नमुने घेऊन तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. मकानदार आणि गायकवाड यांची नावे निष्पन्न झाल्यानंतर गुन्हे शाखेने त्यांचा शोध सुरू केला होता. तांत्रिक विश्लेषण तसेच व खबऱ्यामार्फत शोध सुरू होता. आरोपीना अटक केल्यानंतर दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपींना १० जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

अपघातानंतर अल्पवयीन आरोपीची वैद्यकीय चाचणी करण्यासाठी त्याला ससून रुग्णालयात नेण्यात आले होते. त्याठिकाणी त्याचे रक्त नमुने घेऊन ते कचऱ्याच्या डब्यात फेकून देण्यात आले होते. त्याऐवजी शिवानी अगरवालचे रक्त नमुने घेऊन ते तपासणीसाठी न्यायवैद्यक विभागाकडे पाठविण्यात आले होते. याप्रकरणात शिवानीला अटक करण्यात आली आहे. सध्या ती पोलीस कोठडीत असून तिच्याकडे याविषयी अधिक तपास सुरू आहे. कल्याणीनगर अपघात प्रकरणामधील अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अगरवाल हिचे सोमवारी जनुकीय नमुने (डीएनए) घेण्यात आले आहेत.

अल्पवयीन आरोपीला ससून रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी आणले त्यादिवशी दोन आलीशान कार ससून रूग्णालयात आलेल्या होत्या. यातील एका कारमधून शिवानी आगरवाल आणि तिचा सासरा सुरेन्द्र अगरवाल ससूनमध्ये आलेला होता. तर, दुसऱ्या कारची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. या गाडीमधून आलेल्या व्यक्तीने अतुल घटकांबळेशी संपर्क साधलेला होता. त्यानेच घटकांबळेकडे पैसे दिल्याचे समोर आले असून त्या व्यक्तीची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. येत्या दोन दिवसांत ही व्यक्ती कोण आहे याविषयी खुलासा होण्याची शक्यता असून ससूनच्या डॉक्टरांना देण्यात आलेले पैसे कुठून कसे आणण्यात आले याबाबत देखील माहिती समोर येणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

आरोपी अल्पवयीन मुलाला वैद्यकीय चाचणीसाठी ससून रुग्णालयात आणण्यात आले त्यादिवशी दोन आलीशान गाड्या ससूनच्या आवारात आलेल्या होत्या. त्यामधील एका गाडीमधून आरोपीचा आजोबा सुरेन्द्र अगरवाल आणि त्याची आई शिवानी अगरवाल ससूनमध्ये आले होते. तर, दुसऱ्या गाडीमधून अश्पाक मकानदार आणि अमर गायकवाड हे दोघे आले होते. या दोघांनीच अतुल घटकांबळेकडे रक् नमुने बदळण्याकरिता तीँन लाख रुपये दिले होते.

अश्पाक मकानदार हा आमदार सुनील टिंगरे यांचा कार्यकर्ता असल्याचे सांगितले जाते. तो अपघातानंतर पोलीस ठाण्यात देखील हजर होता. आमदार टिंगरे यांच्या जवळच्या कार्यकर्त्याला अटक झाल्याने खळबळ उडाली आहे. टिंगरे यांच्या भूमिकेविषयी वारंवार टीका करण्यात येत होती. टिंगरे यांनी आपण आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न केला नव्हता असा दावा केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील टिंगरे यांची पाठराखण केली होती.'

मकानदार याचे नाव सुरुवातीपासून चर्चेत आलेले होते. मात्र, त्याला हात घालण्यास पोलीस कचरत होते. ४ जून रोजी लोकसभेची मतमोजणी होणार होती. मतमोजणीच्या दिवशी राजकीय पक्ष, नेते आणि प्रसार मध्यमे व्यस्त असणार याची पोलिसांना कल्पना होती. हे 'टायमिंग' साधत पोलिसांनी दोघांना अटक करून न्यायालयात हजर केले.

# पोलिस व्हॅनच्या धडकेत महिला जखमी; चालक पोलिसाची होणार वैद्यकीय तपासणी

**पिंपरी । प्रतिनिधी**

पोलिस वाहनाने महिलेसह एका दुचाकीला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाली आहे. तसेच, एका दुचाकीचेही नुकसान झाले आहे. ही घटना मंगळवार (दि. ४) दुपारी अडीचच्या सुमारास बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथील पोलिस चौकीसमोर घडली.

नागेश भालेराव (नियुक्ती, हिंजवडी पोलिस ठाणे), असे चालक पोलिस अंमलदाराचे नाव आहे. या अपघात शंकुतला पंडित शेळके (रा. महाळुंगे) या जखमी झाल्या असून त्यांच्यावर एका खासगी



रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मावळ लोकसभा मतदार संघाची मतमोजणी मंगळवारी (दि.४) बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे पार पडली. या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी पिंपरी- चिंचवड पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. बंदोबस्त सुरु असताना ड्युटीवरील अंमलदार नागेश भालेराव शासकीय वाहनात बसले होते. त्यावेळी वाहनाचे इंजिन सुरु होते.

दरम्यान, भालेराव यांचा पाय वेग वाढवण्याच्या पेडलवर (ॲक्सीलेटर) पडला. त्यामुळे वाहनाने समोरून पायी जाणाऱ्या शकुंतला यांच्यासह उभ्या दुचाकींना धडक दिली. यामध्ये शकुंतला यांना गंभीर दुखापत झाली. तसेच, एका तरुणाच्या दुचाकीचे मोठे नुकसान झाले. अचानक झालेल्या आवाजामुळे माध्यमांच्या प्रतिनिधींसह पादचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.माध्यमांच्या प्रतिनिधींनी भालेराव यांना जखमी महिलेला तत्काळ रुग्णालयात घेऊन जाण्याबाबत सुचवले. त्यावेळी उपस्थित पोलिसांनी त्यांच्याशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. तसेच, रुग्णवाहिका आल्यानंतर महिलेला घेऊन जाऊ, असे बोलून एका पोलिसाने अरेरावी केली. माध्यमांच्या प्रतिनिधींनी याबाबत जाब विचारण्यास सुरुवात केल्यानंतर एकच गोंधळ उडाला. घटनास्थळी आलेल्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी शकुंतला यांना पोलीस वाहनातून रुग्णालयात नेत वातावरण शांत केले. शकुंतला यांची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. हिंजवडी पोलिस तपास करत आहेत.

# आढळराव पाटलांच्या विरोधात कोल्हे विजयी

## पण खरा पराभव अजितदादांचाच!!

**पुणे । प्रतिनिधी**

शिरूर लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अमोल कोल्हे विजयी झाले आहेत. १ लाख ५३ हजार मताधिक्याने त्यांनी विजय मिळवला आहे. कोल्हे यांनी अजित पवार गटाच्या शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पराभव केला असला तरी, हा खरा पराभव उपमुख्यमंत्री अजित पवार यांचाच मानला जात आहे.

१५ व्या फेरीअखेर अमोल कोल्हे यांनी ७२ हजार मतांची निर्णायक आघाडी घेतली होती. तर १४ व्या फेरीत त्यांना ३ लाख ८३



हजार ४५५ मते मिळाली होती. आढळराव पाटील यांना या फेरीत ३ लाख १८ हजार ४३० मते मिळाली. निवडणूक प्रचारादरम्यान अजित पवार यांनी शिरूर मतदारसंघात महायुतीचा उमेदवार निवडून आणणारच, असा निर्धार केला होता. तसेच यावेळी बिनकामाचा नको, तर कामाचा माणूस म्हणून आढळराव यांना लोकसभेत पाठवा, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले होते. मतदारांनी मात्र अजित पवार यांना धक्का देत पुन्हा एकदा अमोल कोल्हे यांना कौल दिला आहे.

# बच्चा बडा हो गया!' सुप्रिया सुळेंच्या निर्णायक विजयावर रोहित पवारांचे ट्विट

**बारामती । प्रतिनिधी**

लोकसभा मतदारसंघात इंडिया आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे या निर्णायक आघाडी घेताना दिसत आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार (अजित पवार गट) सुनेत्रा पवार या सुरवातीपासूनच पिछाडीवर असलेल्या बघायला मिळाल्या. सुळेंच्या निर्णायक विजयावर आमदार रोहित पवार यांनी द पोस्ट करत अजित पवारांवर टीका केला आहे.

रोहीत पवार यांनी द पोस्टमध्ये म्हटले आहे की, काही नेत्यांना वाटतं की नवीन पिढीला नेता बनण्याची घाई झालीय; पण त्यांना सांगायचंय की, नेता बनण्याची घाई नाही



तर सध्या ज्या खालच्या पातळीला राजकारण गेलं त्याचा स्तर सुधारण्याची मात्र नक्कीच घाई झालीय. बारामतीत सुप्रियाताईंचा विजय हा आदरणीय पवार साहेबांच्या विचारांचा, सुप्रियाताईंच्या कष्टाचा, मविआचे सर्व पदाधिकारी व सामान्य कार्यकर्ते यांच्या त्यागाचा आणि दडपशाहीला झुगारलेल्या स्वाभिमानी सामान्य जनतेच्या प्रेमाचा आहे. या दणदणीत विजयाबद्दल सुप्रियाताईंचं मनापासून अभिनंदन!, असेही आमदार रोहित पवार एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे.

# पुणे जिल्ह्यात मुसळधार पावसाची हजेरी! धानोरी भागात अनेकांच्या घरात शिरलं पाणी, जनजीवन विस्कळीत

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात जोरदार पाऊस झाला आहे. धानोरी भागात दुपारपासून जोरदार पाऊस पाहायला मिळत आहे. धानोरी परिसरात मुसळधार पाऊस झाल्यानंतरची पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. स्थानिक लोकांचं दुकानदारांचा मोठं नुकसान झालं आहे. पहिल्या पावसानंतर पुण्यातील धानोरी भागात जनजीवन विस्कळीत परिस्थिती झाली आहे. अनेक भागांमध्ये पाणी भरलं आहे, लोकांच्या घरामध्ये पाणी शिरलं आहे. महापालिकेकडून पावसापूर्वीची कामं झाली आहेत का नाही, असा प्रश्न पुणे करांकडून विचारला जात आहे.




पुण्यामध्ये दुपारी काही वेळासाठी झालेल्या मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचलं आहे. एवढ्या कमी वेळेसाठी पाऊस पडून एवढं पाणी साचत असेल, तर महापालिकेनं नेमकं काय काम केलं आणि मान्सूनपूर्वी काय तयारी केली आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. धानोरी भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यांना तळ्याचं स्वरुप आलं आहे. रस्त्यावर उभ्या चार चाकी गाड्या पाण्याखाली गेल्या आहेत.

पुणे महापालिकेकडून दरवर्षी मान्सून पूर्व तयारीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. पण आज पुण्यात काही वेळासाठी पाऊस पडला. धानोरी परिसरात दुपारी जोरदार पाऊस पाहायला मिळाला. अगदी काही वेळासाठी झालेल्या पावसाने पुणेकरांची दैना उडाली. लोकांच्या दुकानात आणि घरात, पाणी शिरलं. नाले वाहू लागले, रस्त्यावर पाणी साचलं. अक्षरक्ष:रस्त्यावर गुडघाभर पाणी साचल्याचं दिसून येत आहे. याचे व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

मान्सून पूर्वीच्या कामांसाठी पुणे पालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करुनही पुणेकरांचा हाल झाल्याचं दिसत आहे. काही तासांच्या पावसाने पुण्यातील रस्त्यावर पाणी साचलं आहे. पहिल्या पावसाने पुण्यात पाणी साचल्याची परिस्थिती पाहायला मिळत असेल, तर संपूर्ण पावसाळ्याता पुण्यातील परिस्थिती काय असेल, पुणेकरांचे असेच हाल होणार का, असा सवाल सध्या पुणेकरांकडून उपस्थित केला जात आहे.

**पुढील ४८ तासांत पावसाची शक्यता**


पुण्यासह राज्यात विविध भागात पुढील ४८ तासांत पावसाची शक्यता हवामान विभागाने याआधीच वर्तवली आहे. आज कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई आणि उपनगरात उष्णतेच्या लाटेचा इशारा आहे.

# सुप्रिया सुळे बारामतीतून विजयी

**बारामती । प्रतिनिधी**

बारामतीत २४ व्या फेरी अखेर सुप्रिया सुळेंनी ७ लाख २८ हजार ०६८ मतांनी विजयी आघाडी घेतली आहे. सुरुवातीपासून सुप्रिया सुळेंनी आघाडी घेतली होती. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार पिछाडीवर होत्या. यावरून आता बारामतीकर सुप्रिया सुळेंच्या पाठीशी असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

२४ व्या अंतिम फेरीत सुप्रिया सुळे यांनी ७ लाख २८ हजार ०६८ मते मिळवली आहे. तर सुनेत्रा पवार यांना ५ लाख ७४ हजार ५३८ मते मिळाली आहेत. या शेवच्या मतमोजणी फेरीत सुप्रिया सुळे १ लाख ५३ हजार ०४८ मतांनी विजयी आघाडी घेतली आहे.



अद्याप पोस्टल मते समाविष्ट झाली नाहीत. बारामतीत मतमोजणीच्या फेऱ्या संपल्या आहेत.

मतमोजणीत सुप्रिया सुळे यांनी निर्णायक आघाडी घेतली. यानंतर सुनेत्रा पवार यांच्या विजयाचे बॅनर हटवण्यात आले. सुळे यांच्या विजयाकडील वाटचाल सुरु असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कार्यकर्ते जल्लोष करत आहेत.

# विजयापूर्वीच झळकलेले सुनेत्रा पवारांचे बॅनर उतरवले;बारामतीत सुप्रिया सुळेंच्या विजयाचा जल्लोष

पुणे । प्रतिनिधी

देशातील लोकसभा निवडणुकांच्या निकालाचे अपेडट हाती येत असून महाराष्ट्रात महाविकास आघाडीला मोठं यश मिळाल्याचं दिसून येत आहे. त्यातच, राज्याचे लक्ष लागेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात यंदा हाय व्होल्टेज लढत होती. सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी जरी लढत असली तर ही लढत थेट शरद पवार विरुद्ध अजित पवार अशीच झाल्याचं पाहायला मिळालं. येथील निवडणुकीत बारामतीकरांनी सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाला नाकारलं असून सुप्रिया सुळेंनी बाजी मारली आहे. त्यामुळे, दोन दिवसांपूर्वी इंदापूरमध्ये सुनेत्रा पवार यांच्या विजयाचे लागलेले बॅनर




काढण्यास सुरुवात झाल्याचं पाहायला मिळत आहे.

लोकसभा निवडणुकांची मतमोजणी आज सकाळपासून सुरू झाली. मात्र, उत्साही कार्यकर्त्यांनी आपल्या उमेदवारांचे बॅनर निकलापूर्वीच लावण्यास सुरुवात केली होती. खरंतर यंदा अतिशय चुरशीच्या लढती झाल्याने कोणीचं ठामपणे निकाल सांगू शकत नाही, अशी परिस्थिती होती. यातच बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले होते. इथून शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या सुप्रिया सुळे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यात काट्याची लढत झाली. त्यानंतर, इंदापूर परिसरात निकालाच्या तीन दिवस आधीच सुप्रिया सुळे यांच्या विजयाचे बॅनर लागले आहेत. इंदापूर शहरातील ओबीसी सेलचे शहराध्यक्ष मयूर शिंदे यांनी हे बॅनर लावले होते. मात्र, आता सुनेत्रा पवारांच्या पराभवानंतर हे बॅनर उतरवण्यात आले आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे यांच्या विजयाचे खात्री होताच इंदापूरमधील सुनेत्रा पवार यांचे बॅनर उतरवण्यात आले आहेत. अति उत्साही कार्यकर्त्यांनी सुनेत्रा पवार यांचे विजयाचे लावलेले बॅनर अखेर पराभवाची खात्री होताच खाली उतरवले. बारामती लोकसभा मतदारसंघातील इंदापूर शहरात काही अति उत्साही कार्यकर्त्यांनी बॅनर लावले होते. अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने सुनेत्रा पवार व शरद पवार गटाच्याही कार्यकर्त्यांकडून सुप्रिया सुळे यांचे देखील बॅनर विजयी झालेल्या शुभेच्छा देऊन झळकवण्यात आले होते. यातील सुनेत्रा पवार यांचे बॅनर उतरवण्यात आले आहेत. अखेर इंदापुरातील अति उत्साही पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनीसुप्रिया सुळे यांच्या विजयाची खात्री होताच सुनेत्रा पवार यांच्या विजयाचे लावलेले बॅनर उतरवले आहेत.